# आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेले मराठी मासिक

वर्ष 26 अंक 1 एप्रिल 2015

## ह्या अंकात


| | |
|---|---|
| 'देवळाचा धर्म आणि धर्माची देवळे' *प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे* | 2 |
| नीतीची मूलतत्वे (पूर्वार्ध) *अशोक गर्दे* | 2 |
| गोळीने विचार मारता येतात का? *डॉ. हमीद दाभोलकर* | 6 |
| दलित स्त्रियांची आत्मकथने : एक ऐतिहासिक दस्तऐवज *माया पंडित* | 9 |
| माझे मनोगत...... *भालचंद्र काळीकर* | 17 |
| 'मानव विकास अहवाला'त भारत *देवेन्द्र इंगळे* | 19 |
| सुसह्य नागरीकरणासाठी हवा संतुलित विकास *अभय टिळक* | 21 |
| अनश्व रथ, पुष्पक विमान या लेखमालिकेवरील चर्चासत्र *अनुराधा मोहनी* | 23 |
| मला दंड द्या! *रमाकांत पाठक* | 32 |



संस्थापक – संपादक

**दि. य. देशपांडे**

(1918-2006)

कार्यकारी संपादक

**प्रभाकर नानावटी**

**संपर्कः**

प्रभाकर नानावटी pkn.ans@gmail.com 9503334895

भरत मोहनी bharat_i@yahoo.com 9822736808

aajacha.sudharak@gmail.com

# 'देवळाचा धर्म आणि धर्माची देवळे'

सर्वव्यापी देवाला चार भिंतींच्या आणि कळसबाज घुमटाच्या घरात येऊन राहण्याची जरूरच काय पडली होती! बौद्धधर्म हिंदुस्थानांतून परांगदा होईपर्यंत (म्हणजे इसवी सनाचा उदय होईपर्यंत) तरी भारतीय इतिहासात देवळांचा कोठेच काही सुगावा लागत नाही. मग तोपर्यंत आमचे हे हिंदू देव थंडीवाऱ्यात कुडकुडत आणि उन्हातान्हांत धडपडत पडले तरी कोठे होते? विद्वान संशोधकांच्या मते, आर्यांच्या ऋग्वेदकाळाची गणना जास्तीत जास्त इसवी सनापूर्वी ७००० वर्ष धरली, तर इतकी वर्षे हे आमचे मोक्षदाते देव, देवळाशिवाय जगले तरी कसे आणि कोठे? आजचा त्यांचा देवळातला थाट पाहिला, तर जिवंत माणसाला एक वेळच्या कोरडय़ा भाकरीची पंचाईत! पण या देवांना सकाळची न्याहारी! दुपारी पंचपक्वान्नांचे भरगच्च ताट! पुन्हा तीन प्रहरी टिफीन आणि रात्री जेवण! याशिवाय दिवस सुना जायचा नाही.''

प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे
'देवळाचा धर्म आणि धर्माची देवळे' या पुस्तकावरून

•••

# **नीतीची मूलतत्वे** (पूर्वार्ध)

*अशोक गर्दे*

विवेक नीती

नीती आपल्याला समाजात कसे वागावे ते सांगते. नीतीचे नियम ‘काय करावे’ आणि ‘काय करू नये’ या विषयी असतात. असे नियम जो पाळतो तो/ती नीतीमान: अशा व्यक्तीची नीतिमत्ता चांगली आहे असे म्हटले जाते. समाजात सर्वांनी नीतीने वागावे अशी अपेक्षा असते. परंतु काय करावे वा करू नये हे ठरवायचे कसें ‘चांगले वागावे, वाईट वागू नये’ हे खरे, पण ‘चांगले’ काय हे नक्की कसे ठरवायचे? एखाद्याला जे चांगले वाटेल ते दुसऱ्याला तसे वाटेलच असे नाही.

वागणूक चांगली-वाईट, इष्ट-अनिष्ट,योग्य-अयोग्य हे ठरवण्याचा मक्ता धर्मसंस्थेने घेतलेला आहे. प्रत्येक धर्म – उपासना पद्धती –ठरवतो की कांही गोष्टी चांगल्या व कांही वाईट: त्यांना पाप आणि पुण्य अशी नावे ही दिली जातात. पाप-पुण्य ठरवण्यासाठी ‘देव’ – एक अदृश्य शक्ती - या संकल्पनेचा आधार घेऊन “ पाप कराल तर देव शिक्षा करेल” असे सांगून मानवाच्या वर्तणुकीवर लगाम लावला जातो. मात्र पाप काय व पुण्य काय हे सांगणारी माणसेच असतात, पण ती ‘देवाने निवडलेले’ प्रेषित किंवा ऋषी असतात. श्रद्धाळू यावर विश्वास ठेवतात. परंतु आपला अनुभव दाखवून देतो की “पाप केल्याने देव शिक्षा करतो” या नियमाला हजारो अपवाद आहेत. ‘वाईट’ वागणाऱ्याना शिक्षा होणे बाजूलाच, अशी माणसे श्रीमंत पण होऊ शकतात आणि सुखात राहताना दिसतात. शिवाय हजार-दोन हजार वर्षे अनेक धर्मांच्या प्रयत्नांनी सुध्दा पाप करणे बंद झालेले दिसत नाही. म्हणजेच अदृश्य शक्तीची भीती फार उपयोगी ठरते असे नाही.

माणसाने कसे वागावे हे नक्की करण्यासाठी अशा तर्काला न पटणाऱ्या भीतीची जरूरच नसावी. “विवेकाची कास धरून नीतीमत्तेचे नियम बनवता येतील का?” ह्या प्रश्नाचे उत्तर विसाव्या शतकापासून होकारार्थी आहे. तर्कशास्त्रावर भिस्त ठेवून, कुठल्याही प्रकारच्या अमूर्त देव-संकल्पनेचा आधार न घेता नीतीचे नियम ठरवता येतात्त व ते तसे ठरवले गेलेले आहेत. हे ठरवायची पद्धत इतकी साधी व समजायला सोपी आहे की ती सर्वांना समजेल आणि पटेल.

**नीतिमत्ता**

नितीमत्तेची तीन अंगे आहेत. ज्याला आपण सर्वमान्य असा ‘सदाचार’ (morals) म्हणतो हे एक अंग; दुसरे अंग आहे ‘सदवृत्त’ (ethics) आणि तिसरे आहे कायदा (laws). भारतीय व इतर पौर्वात्य संस्कृतींमध्ये एथिक्स ही संकल्पना नाही, आणि पाश्चिमात्य संस्कृतीत पण सदाचार व सदवृत्त यातील फरक स्पष्ट दाखवलेला नाही. या तीनही संकल्पनांच्या व्याख्या खालील प्रमाणे केलेल्या आहेत.

समाजातील प्रत्येक व्यक्ती तिच्या स्वतःच्या सुखासाठी/हितासाठी कृती करत असते. कृती या दोनच प्रकारच्या असतात: ज्यांचा इतर एक अथवा अनेक व्यक्तींवर परिणाम होउ शकतो अशा, किंवा ज्यांचा इतर कोणावरही काही परिणाम होत नाही अशा. ‘रांगेत पुढे घुसणे’ ही कृती इतरांवर परिणाम करणारी आहे, पण ‘पुस्तक वाचणे’ ही कृती इतर कोणावरही परिणाम करणारी नाही. (केवळ मनोविकृतीने पछाडलेली माणसे जाणून बुजून स्वतःला त्रास होईल अशी कृती करतात.)

सदवृत्त: समजा ‘क’ या व्यक्तीने स्वतःच्या सुखासाठी ‘क्ष’ ही कृती केली व तिचा परिणाम ‘ख’ या व्यक्तीवर झाला. आता ‘ख’ ने तीच कृती ‘क्ष’ केली, तर तिच्या परिणामाने ‘क’ सुखी राहील का? जर राहिला, तर क्ष सदवृत्तात मोडेल. अशी कृती कारणे ‘चांगले’ ‘इष्ट’ अथवा ‘योग्य’ ठरते. जर ख ने क्ष केल्यावर क दुःखी होत असेल तर क्ष ही कृती वाईट/अनिष्ट/अयोग्य ठरते.

उदाहरण घेतले की ही व्याख्या सहज समजेल. “मी (व्यक्ती क) जर तुमचे (व्यक्ती ख) रु. 1000 चोरले (कृती क्ष) तर मी खुष होइन. पण तेच तुम्ही माझे पैसे चोरले तर मी दुःखी होईन. म्हणून ‘चोरी करणे’ ही कृती वाईट. चोरी कारणे हे सदवृत्तात मोडत नाही, ते सद्वर्तन नाही.

आपण जसे इतरांशी वागतो तसेच त्यांनी वागले तर आपल्याला चालेल का? हाच साधा विचार सदवृत्त म्हणजे काय ते सांगतो.

सदाचार: अगदी लहान असल्यापासून व्यक्तीच्या मनावर काय करावे व काय करू नये याची जी शिकवण मनावर ठसविली जाते त्या सर्वांची यादी म्हणजेच सदाचाराचे नियम. सर्वप्रथम आई-वडील, नंतर कुटुंब, धर्म, शाळा, जात-जमात, विद्यापीठ, व समाज इ. सर्वांतर्फे ‘करा’, ‘नका करू’ चे धडे मिळत असतात. व्यक्ती क्वचितच त्याविषयी स्वतंत्र विचार करते. हे धडे मनात इतके ठाम ठसलेले असतात की ते ‘योग्यच’ आहेत अशी भावना असते.

सदवृत्ताचे व सदाचाराचे नियम हे स्वेच्छेने पाळावयाचे असतात. प्रत्येक व्यक्ती असा कुठलाही नियम पाळावा की नाही ते ठरवू शकते व तशी वागू शकते.

कायदा: समाजाला जेव्हा कांही नियम सर्वांनी सक्तीने पाळावेत असे वाटते तेव्हा त्या नियमाला कायदा म्हणतात. असा नियम तोडला –कायदा मोडला –तर व्यक्तीला शिक्षा दिली जाते.




नीतीच्या या तीन अंगांचा परस्पर संबंध आकृती दर्शवते. यातील प्रत्येक वर्तुळ एकेक अंगातील सर्व कृतींचा समुदाय दर्शवते.या तीन छेदणाऱ्या वर्तुळातून सात वर्ग निर्माण होतात. जगातील कुठल्याही व्यक्तीने/समुदायाने केलेली कुठलीही कृती या सातापैकी एका वर्गात पडते, मग ती कृती इतरांवर परिणाम करणारी असो व नसो. प्रत्येक कृती ही त्या वर्गात ‘स्वीकारणीय’ ‘त्याज्य’ अथवा ‘तटस्थ’ असते. उदा: ‘हिंदू व्यक्तीने गाईचे मांस खाणे.’ ही कृती

सदाचाराच्या दृष्टीने (हिंदूंसाठी) वाईट आहे; व्यक्ती मुसलमान, ख्रिस्ती किंवा बौध्द असली तर त्यांच्या सदाचारात ही कृती बसते. 'जैन व्यक्ती बटाटा खाते' यातील कृती पण अशीच आहे. इतरांना बटाटा खाणे वाईट किंवा निषिद्ध नसते. क ने गोमांस खाल्ले तर ख वर काहीच परिणाम होत नाही. आणि भारतात गोमांस खाऊ नये असा कायदा नाही. म्हणजे ही कृती सदवृत्तात तटस्थ, सदाचारात त्याज्य आणि कायद्यात तटस्थ आहे.

'खाणे' ही कृती नेहमीच सदवृत्ताला तटस्थ असते; अपवाद एकच - माणसाचे मांस खाणे. खाणारा व खाद्य यांची अदलाबदल केली तर सुख देत नाही म्हणून!

दुसरे एक उदाहरण घेऊया: 'समलिंगी संभोग'. हा करणाऱ्या क आणि ख दोन्ही व्यक्ती सुखी होत असल्याने हा प्रकार सदवृत्तात बसतो, पण बहुतेकांच्या सदाचारात बसत नाही. कांही देशात (अजून भारतात सुद्धा) यास कायद्याने बंदी आहे. म्हणजे ही कृती सदवृत्तात स्वीकार्य, सदाचारात त्याज्य आणि कायद्यात कुठे तटस्थ तर कुठे त्याज्य असते.

तिसरे उदाहरण 'चोरी करणे': ही कृती सदवृत्त, सदाचार आणि कायदा या तिन्ही अंगांनी त्याज्य आहे.

एव्हाना तुमच्या लक्षात आले असेल की आपण पाप व पुण्य ह्या दोन्ही शब्दांना एकदम छाट दिली आहे. या देव या संकल्पनेशी जोडलेल्या असल्याने त्यांच्या संबंधात प्रश्न उभे करण्याची परवानगी नसते, तर्काला वाव नसतो, त्या निव्वळ (अंध?) श्रद्धेवर आधारित असतात.

कुठल्याही कृतीचे वर्गीकरण करताना पूर्वग्रह आणि भावना यांचा वापर होऊ देता नये. हे लक्षात यावे म्हणूनच दोन 'प्रक्षोभक' उदाहरणे निवडली होती!

यावरुन लक्षात येते की:

- सदवृत्त हे सर्व मानवजातीला लागू पडते: सदवृत्त हे देश-काल-संस्कृती यांवर अवलंबून नसते.
- सदाचार हा संस्कृतीसापेक्ष असतो व
- कायदा हा देशसापेक्ष असतो.

**नीतीतत्वांचा व्यवहारात उपयोग**

नीतीत काय बसते आणि काय नाही यावर एकमत होत नाही असे अनेकदा दिसून येते याला कारण आपण नीतीमत्तेच्या तीन अंगांचा स्पष्ट विचार करीत नाही. एकदा का सदवृत्त, सदाचार आणि कायदा यांच्या व्याख्या समजल्या आणि या तिन्ही अंगांचे परस्पर संबंध लक्षात आले की मनातला गोंधळ मिटतो. कुठल्याही कृतीचे वर्गीकरण सर्वांना पटेल अशा प्रकारे करता येते. प्रत्येक कृती प्रत्येक अंगाने स्वीकार्य, त्याज्य अथवा तटस्थ असते हे ही आपण बघितले. आणि असे वर्गीकरण करताना भावना प्रधान न होता, शांत डोक्याने विवेकी विचार करावा लागतो हे पण आपण शिकलो.

वर्गीकरण झाले, पण स्वतः वागायचे कसे?

वर्गीकरण करणे वेगळे आणि ती कृती स्वतःच्या वागणुकीसाठी निवडणे वेगळे:

विवेक सांगतो की सदाचारात गणल्या जाणाऱ्या सर्व कृती या 'चांगल्या' असतातच असे नाही. प्रत्येक धर्मात कित्येक 'सदाचार' असे विचित्र आणि कित्येकदा विघातक आहेत की ते सदवृत्ताच्या कसोटीवर उतरूच शकत नाहीत. मात्र धर्माचा –उपासना पद्धतीचा – पगडा इतका जब्बर असतो, की त्याबाहेर पडून विवेकाने सदवृत्ताची कसोटी लावणे धर्मभोळ्या सामान्य माणसाना कठीण जाते. विवेकवादी विचारसरणी स्वीकारल्यानंतर मात्र अशी कसोटी लावणे सर्वांना जमते. या संदर्भात आपण मुख्य तीन धर्मातील एकेक उदाहरण घेऊन विचार करुया.

- एके काळी हिंदू समाजात 'सती जाणे' हे कृती 'चांगली' समजली जात होती, इतकेच नव्हे तर सती जाणारी स्त्री पूजनीय ठरत होती. 'मेलेल्या नवऱ्याच्या चितेवर स्वतःला जाळून घेणे' हे सदाचारात मोडत असे. हे सदवृत्तात कसे बसेल? जरी नवरा पत्नीव्रती होऊन मेलेल्या बायकोच्या चितेवर स्वतःला जाळून घेऊ लागला (अदलाबदलीचे तत्व), तरी ही कृती सदवृत्त बनत नाही.

- इस्लाम मध्ये विवाहबाह्य संबंध ठेवलेल्या पत्नीला भर चौकात दगड मारून ठार करण्याची सजा 'सदाचारात योग्य मानली जात होती. येथे त्यातील परपुरुषाची काहीच चूक नाही, व तो अपराधी नाहीच! हे सदवृत कसे बसायचे?
- ख्रिस्ती धर्मात एके काळी एखाद्या स्त्रीला चेटकीण ठरवून ठार मारणे किंवा जाळून टाकणे समाजास मान्य होते. हजारो स्त्रिया चेटकीण ठरत! या प्रथेचा बीमोड करायला सती प्रथा बंद करताना आले तसे अनेक अडथळे त्या काळात आले होते.

म्हणून 'चांगले' काय हे ठरवायला प्रत्येक व्यक्तीने स्वतःची बुद्धी वापरली पाहिजे. प्रत्येक सदाचार हा विवेक वापरून सदवृत्ताच्या कसोटीवर तपासून पहिला पाहिजे. मग त्या सदाचारात मोडणाऱ्या कृतीला धर्माचा अथवा समाजाचा कितीही पाठींबा असो, त्याकडे दुर्लक्ष करावे लागते. सदवृत्ताला मान्य नसलेल्या कृती स्वतः करू नयेत व समाजाला पण करू देऊ नयेत. त्यांचा समाजातून बीमोड करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा. सदवृत्ताला अमान्य व त्याज्य असलेल्या कृती स्वीकारू नयेत. समाजाला वा स्वतःला फार त्रासदायक असतील तर त्या संपूर्णपणे सोडून द्याव्यात.

मग सदवृत्ताप्रमाणे मान्य किंवा तटस्थ असलेया कृतींचे काय, त्या सर्व करणीय असतात असे नाही. सदवृत्त्तात समलिंगी संभोग 'चांगला' आहे म्हणून, किंवा गोमांस खाणे 'तटस्थ' आहे म्हणून ह्या कृती कराव्यात असे बिलकुल नाही. अशा कृती कराव्या का नाही हा प्रत्येकाचा खासगी अधिकार आहे. तशी प्रवृत्ती असेल तर अशा गोष्टी कराव्यात, नसेल तर करू नये. मात्र जे अशा कृती करतात त्यांना समजून घ्यावे, त्यांचा तिरस्कार करू नये. समाजात सर्वांनीच सदवृत्ताच्या आड न येणारे व्यक्तीस्वातंत्र्य जपणे जरूर आहे.

सदवृत्तात बसणाऱ्या सदाचारातील कृती अवश्य स्वीकाराव्या व स्वतःच्या आचरणात बाणवण्याचा प्रयत्न करावा.

कित्येक कृती अशा असतात की ज्यांचा इतरांवर काहीच परिणाम होत नाही. उदा. पुस्तक वाचणे, गाणी ऐकणे/म्हणणे, वाद्य वाजवणे, इतरास त्रास होइल इतक्या मोठ्याने नाही), फिरायला जाणे, संगणकावर काम कारणे इ. इ. अशा कृती बहुतांशी सदवृत्ताच्या आणि सदाचाराच्या दृष्टीने तटस्थ असतात. मात्र ते पुस्तक'चावट' असले, किंवा संगणकावर अंतरजाल वापरुन 'चावत' चित्रफिती बघितल्या तर ते सदाचारात मोडत नसावे! अशा कृतींसाठी स्वतःचा निर्णय अप्पाप्ल्या कलाप्रमाणे करावा. मात्र इतरांच्या असल्या अ-सादाचाराविषयी घृणा बाळगू नये.

रोजच्या व्यवहारातील शिष्ठाचार पण नीतिमत्तेचा एक भाग असतात. 'वडीलधाऱ्यांचा आदर करावा.' 'मोठ्यांना वाकून नमस्कार करावा.' 'मोठ्यांना उलट उत्तरे देऊ नयेत' इ अनेक रीती सदवृत्त आणि सदाचार यांना संमत असतात. मात्र 'कुटुंबप्रमुखाचा प्रत्येक निर्णय पाळलाच पाहिजे' हा नियम पाळलाच पाहिजे असे नाही! तो निर्णय जर सदवृत्ताच्या विरुद्ध असेल तर त्याला योग्य रीतीने टाळले पाहिजे. शक्य तोवर त्या निर्णयातील 'वाईट'पणा चांगल्या शब्दात दाखवून तो न मानण्याचे कारण स्पष्ट केले पाहिजे. इतर संस्कृतीत वेगळे शिष्ठाचार असतात हे लक्षात घेणे जरूर आहे. जर ते शिष्ठाचार सदवृत्ताला धरून किंवा तटस्थ असतील. तर त्यांचा मान त्या संस्कृतीत वावरत असताना राखला पाहिजे.उदा: अमेरिकेत लहान मुले अगदी आजी-आजोबाना देखील 'हाय बडी' असे संबोधतात. आपल्याकडे नको, पण तिकडे ठीक, नाही का?

*विवेकी बुध्दीने कुठल्याही 'करा' 'नका करू' अशा आदेशांना तपासून पाहिले पाहिजे.स्वतःच्या वर्तणुकीसाठी निवडायचे 'करणीय' अथवा 'न करणीय' कृतींचे सदाचाराचे नियम सदवृत्त्ताच्या कसोटीवर तपासून घ्यावेत. ते देशातील विद्यमान कायद्याच्या विरुद्ध नाहीत याची खात्री करावी व मगच स्वीकारावेत. सर्व कायद्यांचे पालन तर अनिवार्य समजावे. असे वागणे म्हणजे विवेक वापरून नीतीने वागणे.*

'मी नीतीने वागीन हो, पण बाकीच्यांचे काय? सगळा समाजच बिघडलेला असेल, तर मी सुधारून काय उपयोग? समाज नीतिमान आहे का?

....अपूर्ण

ashokgarde@hotmail.com

# गोळीनं विचार मारता येतात का?

*डॉ. हमीद दाभोलकर*

संघटन लोकशाही सामाजिक समस्या मानसिकता

१६ फेब्रुवारीची सकाळ... डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या हत्येचा तपास दीड वर्ष उलटूनही लागत नाही, याचा निषेध सांस्कृतिक मार्गानं करण्यासाठी 'सॉक्रेटिस ते दाभोलकर व्हाया तुकाराम' हे अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या इस्लामपूर शाखेनं बसवलेलं रिंगण-नाटक घेऊन आम्ही दिल्लीत दाखल झालो. पहिला प्रयोग सुरू करण्याच्या पाचच मिनिटं आधी कोल्हापूरमध्ये कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्यावर गोळ्या झाडल्या गेल्याची बातमी येऊन थडकली. या प्रकारात पानसरे यांच्या पत्नी उमाताईही जखमी झाल्या.

तीच सकाळची वेळ, तेच व्यायामाला जाणं आणि तसेच मोटारसायकलवरून आलेले मारेकरी. आणि व्यक्ती तरी कोणती निवडलेली? डॉ. दाभोलकरांच्या इतकीच विधायक कृतिशील, धर्मचिकित्सेचा आग्रह धरणारी, दलित, वंचित, शोषितांच्या हक्कांसाठी लढणारी आणि लोकशाही मार्गानं जनसंघटन उभं करण्यासाठी हयात वेचणारी.

मनात विचार आला की, 'विवेकी विचारांची ताकद त्या विचारांचा प्रसार करणाऱ्यांना जितकी कळलेली असते, त्यापेक्षा अधिक त्यांच्या विरोधकांना कळलेली असते.' या वाक्याचा प्रत्यय आपल्याकडच्या अंधाराच्या रखवालदारांनी आपल्याला सगळ्यांनाच परत परत द्यायचा ठरवलेला दिसतो. दीड वर्षापूर्वी नरेंद्र दाभोलकरांसाठी ते पुण्याच्या विठ्ठल रामजी शिंदे पुलावर आले, आज ते कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्यासाठी कोल्हापुरात आले. उद्या ते प्रश्न विचारण्याचे धाडस करणाऱ्या आपल्यापैकी कुणासाठीही कुठंही येऊ शकतात.

कुठं जाणार आहोत या रस्त्यावरून आपण?

काही लोक म्हणतात, की कशाला तुम्ही या दोन घटनांचा संबंध लावत आहात? या दोन वेगवेगळ्या घटना असू शकतात. आणखी एक वेगळी मांडणी करणारे विद्वानही या समाजात काही कमी नाहीत. हे विद्वान म्हणतात की, दाभोलकर आणि पानसरे यांच्यावरचा हल्ला या 'मिस्टेकन आयडेन्टिटी'च्या, म्हणजे मारायला आले होते दुसऱ्याला आणि चुकून गोळी झाडली दाभोलकर आणि पानसरे यांच्यावर, अशा प्रकारच्या घटना कशावरून नाहीत?

असतील ना कदाचित; पण आम्हाला हे प्रश्न पडतात, की या देशात राज्यघटनेचंच राज्य चालावं, इथली लोकशाही सक्षम व्हावी आणि या देशातली विधायक कृतिशील धर्मचिकित्सेची ज्योत तेवत राहावी म्हणून काम करणाऱ्या आणि संघटना बांधणाऱ्या नेत्यांवरच बरोबर एकापाठोपाठ एकाच पद्धतीनं हल्ले कसे होतात? आणि ते देखील धर्माच्या नावावर अधर्म वाढत असलेल्या कालखंडात?

विचारस्वातंत्र्यावर प्रेम करणाऱ्या, धर्माची विधायक कृतिशील चिकित्सा करू इच्छिणाऱ्या आणि सामाजिक न्यायाविषयी आग्रही असणाऱ्या या देशातल्या सर्व नागरिकांची सध्या चौफेर कोंडी झालेली आहे. एका बाजूला धर्मनिरपेक्षतेच्या नावावर केवळ मतांचं राजकारण करणारा काँग्रेससारखा पक्ष आणि दुसऱ्या बाजूला धर्माचं राजकारण करून सत्तेचे सोपान चढणारा भारतीय जनता पक्ष, तिसऱ्या बाजूला राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या निष्प्रभ झालेले डावे पक्ष आणि चौथ्या बाजूला सामाजिक न्यायाच्या प्रश्नांविषयी झपाट्यानं संवेदना हरवत चाललेला आणि आर्थिक विकास झाला की सगळे सामाजिक प्रश्न आपोआप सुटतील, असं मानण्यात मग्न असलेला या देशातला प्रचंड मोठा वर्ग. या 'चौपदरी' परिस्थितीतून निर्माण होणाऱ्या पोकळीत घटनाबाह्य आणि हिंसेचे समर्थन करणाऱ्या व्यक्ती आणि संघटना वाढल्या तर त्यात नवल ते कोणतं?

'दाभोलकर आणि पानसरे यांच्यावर होणाऱ्या हल्ल्यांशी आमचा काय संबंध?' असं समजणाऱ्या सर्वांनी हे जाणून घेतलं पाहिजे, की जी हिंसा आज आमच्या कुटुंबात आली, ती उद्या कुणाच्याही कुटुंबात येऊ शकते. या शक्तींना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष बळ देणाऱ्या सगळ्यांनी हे जाणून घेणं आवश्यक आहे, की इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सीरिया (इसिस) आणि तालिबानसारख्या असणाऱ्या या प्रवृत्ती अक्षरशः कोणत्याही थराला जाऊ शकतात.
आपल्या राज्यकर्त्यांची भूमिका तर रोम जळत असताना फिडेल वाजवणाऱ्या निरोसारखी आहे. विचारस्वातंत्र्य आणि धर्मचिकित्सेची लढाई अशी ऐरणीवर आलेली असताना सरकारचा दृष्टिकोन मात्र 'ही दोन गटांतली भांडणं आहेत; त्यात आपण कशाला पडा,' अशी आहे. त्यांच्या हे लक्षात येत नाही किंवा ते हे समजून घेऊ इच्छित नाहीत, की दाभोलकर आणि पानसरे यांच्यावर होणारे हल्ले हे लोकशाहीच्या गाभ्यावर होणारे हल्ले आहेत. विचारस्वातंत्र्य हा लोकशाहीचा गाभा आहे, अहिंसा हे लोकशाहीसाठी खूप महत्त्वाचं मूल्य आहे आणि संघटित धार्मिकता हा लोकशाहीला असलेला सर्वांत मोठा धोका आहे. त्यामुळं या मूल्यांसाठी काम करणाऱ्या लोकांवर होणारे हल्ले हे इथल्या लोकशाहीवरचेच हल्ले आहेत. दाभोलकर आणि पानसरे हे समाजाच्या आत राहून समाजाच्या हितासाठी लढणारे सैनिक आहेत. त्यांच्यावरचा हल्ला हा या देशाच्या अस्मितेवर झालेला हल्ला समजला पाहिजे. हे हल्ले एका प्रकारचे दहशतवादी हल्लेच आहेत आणि त्यांचा तपास आणि प्रतिकार दहशतवादी हल्ल्यांच्या गांभीर्यानेच केला पाहिजे. मात्र, ज्या ठिकाणी दाभोलकरांचे मारेकरी दीड वर्ष सापडत नाहीत, त्यांच्या हत्येच्या तपासात प्लँचेटसारख्या अवैज्ञानिक गोष्टींचा वापर होतो, पानसरे यांच्यावर गोळी झाडणारे पळून जाऊ शकतात, तिथं सरकारला या गोष्टीचं गांभीर्य खरंच कळत नाही, की ते कळूनही घेऊ इच्छित नाही, हा खरा कळीचा प्रश्न आहे.
धर्माच्या नावावर जगभर वाढू लागलेली हिंसा आणि दाभोलकर व पानसरे यांच्यावर होणारे हल्ले हे वेगळे काढता येऊ शकत नाहीत. फ्रान्समध्ये 'शार्ली हेब्दो'वर हल्ला करणारे, पेशावरमध्ये लहान मुलांना ठार मारणारे आणि दाभोलकर व पानसरे यांच्यावर हल्ला करणारे हे कोणत्याही धर्माचं नाव घेत असले, तरी एकाच मनोवृत्तीचे आहेत, हे आपण समजून घेतलं पाहिजे. हिंसेला कोणताही धर्म नसतो आणि एकदा का प्रश्न सोडवण्यासाठी आपण हिंसेचा वापर करावयाचा ठरवला, की भारताचा 'पाकिस्तान', 'श्रीलंका', 'अफगाणिस्तान' किंवा 'सीरिया' व्हायला वेळ लागणार नाही. जणू काही एक संसर्गजन्य रोग समाजाला ग्रासावा त्या पद्धतीनं हिंसा जगभरात सर्वत्र पसरत आहे. विरोधी विचाराच्या व्यक्तीला मारून आपली मतं सिद्ध होत नाहीत, हे समजण्याची क्षमता गमावणं हे हिंसेच्या आजाराचं प्रमुख लक्षण आहे. व्यक्ती आणि कुटुंबापासून ते राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक ठिकाणी या आजाराचा फार मोठा संसर्ग सध्या पसरलेला दिसतो आणि याच रस्त्यानं आपण चालत राहिलो, तर आपण कुठं पोचणार आहोत, हे सांगायला काही भविष्यवेत्त्याची गरज नाही.

**समाज म्हणून आपण काय करावं?**

ही परिस्थिती बदलण्याची तातडीची प्राथमिक जबाबदारी राज्यकर्त्यांची आहे, हे आपण नाकारूच शकत नाही. दाभोलकर यांचे मारेकरी जर तातडीने पकडले गेले असते, तर कदाचित पानसरे यांच्यावर हल्ला करण्याचं धाडस या विचारांच्या मारेकऱ्यांचं झालं नसतं. दाभोलकर यांच्या हत्येच्या तपासातलं अपयश हे केवळ पोलिस दलाचं आहे, असं म्हणून थांबता येणार नाही. 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे बिरूद जर खरंच महाराष्ट्र पोलिसांना वास्तवात आणायचं असेल, तर सत्प्रवृत्तीच्या लोकांवर लागोपाठ हल्ले होतात आणि खल प्रवृत्तीचे लोक मोकाट फिरतात, हे चित्र चालणार नाही. पानसरे यांचे हल्लेखोर तातडीनं पकडले गेले तर सगळं सत्य चित्र समाजासमोर येईल आणि कदाचित दाभोलकर यांच्या खुनाच्या तपासातही काही प्रगती होऊ शकेल. मात्र, त्यासाठी राज्य सरकारनं नेहमीच्या कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नापलीकडं जाऊन या हल्ल्यांचं गांभीर्य समजून घेतलं पाहिजे आणि आपली सर्व शक्ती तपासासाठी लावून एखाद्या दहशतवादी हल्ल्याचा तपास केल्याप्रमाणे या घटनांचा तपास केला पाहिजे. जोपर्यंत राज्यकर्ते हे करत नाहीत, तोपर्यंत समाज म्हणून लोकशाही आणि सनदशीर मार्गानं आपण आपला निषेध अधिकाधिक तीव्रपणानं आणि संघटितरीत्या व्यक्त करत राहिलं पाहिजे. हेदेखील आपण समजून घेतलं पाहिजे, की मारेकरी पकडले गेल्यानं आणि

त्यांना शिक्षा झाल्यास (जी होणं हीदेखील आपल्या समाजात काही दशकांची लढाई आहे) केवळ एक पाऊल पुढं पडेल. त्यामुळं बाकीचे सगळे प्रश्न आपोआप सुटतील, असं होणार नाही. खरी धर्मनिरपेक्षता, लोकशाही सक्षमीकरण आणि सामाजिक न्यायाचं समाजकारण आणि राजकारण करणाऱ्या पक्षांची आणि सामाजिक संघटनांची पोकळी भरून काढणं हे आपल्या समोरचं एक दीर्घकालीन आणि अत्यंत मोठं आव्हान आहे.

'आम आदमी पार्टी' (आप) सारख्या पक्षाचा राजकीय क्षितिजावर उदय, याकडं या दृष्टीनं एक प्रसादचिन्ह म्हणून पाहता येईल; पण केवळ लोकानुनय करणाऱ्या राजकारणापलीकडं जाऊन सामाजिक न्यायाच्या प्रश्नासाठी आणि धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यासाठी 'आप'सारखा पक्ष भूमिका घेईल, हे पाहणं आपलं सर्वांचे नागरिक म्हणून अत्यंत महत्त्वाचं कर्तव्य आहे. डाव्या पक्षांनीदेखील आपल्या आर्थिक भूमिकांचा पुनर्विचार करत समाजाशी तुटलेली नाळ परत जोडण्यावर भर दिला पाहिजे आणि धर्मनिरपेक्षतेसाठीची लढाई ही भारतासारख्या देशात आर्थिक प्रश्नांवरच्या लढाईइतक्याच तीव्रतेनं लढण्याला प्राधान्य दिलं पाहिजे. काँग्रेस पक्ष आताच्या गलितगात्र आणि धोरणहीन परिस्थितीतून बाहेर पडण्याची काहीही चिन्हं दिसत नसताना 'आप' आणि डाव्या पक्षांवर ही राजकीय पोकळी भरून काढायची फार मोठी जबाबदारी आहे.

मात्र, ही लढाई केवळ राजकीय पातळीवरदेखील लढून पुरेसं होणार नाही. राजकारणाच्या पलीकडं सामाजिक न्यायाच्या प्रश्नावर लढणाऱ्या राष्ट्र सेवा दल, कष्टकऱ्यांची चळवळ, नर्मदा बचाव आंदोलन, आंबेडकरी विचारांच्या संघटना, 'अंनिस' यांसारख्या सर्व संस्था-संघटनांनी आपले लढे जराही मागे न हटता आणि एकमेकांच्या हातात हात घालून अधिक तीव्र आणि अधिक व्यापक केले पाहिजेत.

आणखी एक गोष्ट आपल्याला करावी लागेल. आर्थिक विकासानं सर्व प्रश्न आपोआप सुटतील, असं वाटणारा जो मोठा वर्ग या समाजात तयार झाला आहे, त्याला केवळ झोडपत बसण्यापेक्षा आपण त्या वर्गाला आर्थिक विकासाबरोबरच सामाजिक न्याय हीसुद्धा लोकशाहीसाठी महत्त्वाची गोष्ट आहे, हे सांगणं सुरू केलं पाहिजे. धार्मिक कट्टरवाद आणि हिंसा या आर्थिक विकासासाठी घातक तर आहेतच; पण व्यापक समाजहितासाठी देखील घातक आहेत, हेही त्या वर्गाला आपण पटवून दिलं पाहिजे. खासकरून या वर्गामधले जे तरुण-तरुणी अपुऱ्या आकलनामुळं सामाजिक न्यायाच्या प्रश्नांशी जोडून घेत नाहीत, त्यांच्यावर पहिले लक्ष केंद्रित केलं गेलं पाहिजे.

राहिला प्रश्न राज्यघटनेतल्या मूल्यांच्या अवमूल्यनाचा आणि धर्माच्या राजकारणाची बाजू घेणाऱ्या लोकांचा. राज्यकर्त्यांनी या प्रवृत्तींना लगाम घालावा म्हणून सजग नागरिकांनी प्रयत्न तर करायला हवेत; पण केवळ तितकेही पुरेसं नाही. महात्मा गांधीजींनी ब्रिटिश सत्तेविषयी जी भूमिका घेतली होती, तीच भूमिका आपल्याला या शक्तींसंदर्भात घ्यावी लागेल. गांधीजी म्हणत, 'आपला विरोध जुलमी ब्रिटिश सत्तेला आहे. इंग्रजसाहेब हा आपला मित्र आहे.' त्याच पद्धतीनं आपल्याला असं म्हणावं लागेल, 'आपला विरोध धर्माचं कट्टरीकरण करणाऱ्या आणि त्यासाठी विधिनिषेध न बाळगता हिंसा करणाऱ्या प्रवृत्तींना आहे; त्या व्यक्तींना नाही.' ज्या वेळी आपले जवळचे लोक आपण अशा प्रकारच्या हिंसेमध्ये गमावतो, तेव्हा असं म्हणणं हे खूप अवघड असू शकतं, हे मी अनुभवत आहे; पण भावनिकतेच्या पलीकडं जाऊन विचार केला, तर हाच एक मार्ग योग्य आहे आणि प्रश्नांच्या दीर्घकाळ सोडवणुकीसाठी आपल्याकडं तोच उपलब्ध आहे, हे लक्षात येतं.

या सगळ्याच्या पलीकडं जाऊन 'माणूस मारून विचार संपत नाहीत...संपत नसतात,' हे चिरंतन सत्य आपण या लोकांना सातत्यानं सांगत राहिलं पाहिजे. त्यांना आपण हे सांगत राहिलं पाहिजे, 'विचार संपवण्यासाठी माणसं मारणे हे वनस्पतीचं बीज नष्ट करण्यासाठी त्याला जमिनीत गाडण्याइतकं व्यर्थ आहे. तुम्ही जितकी बीजं गाडाल, तितकी जास्त झाडं उगवतील!' सॉक्रेटिसला विष पाजून विवेकवाद संपला नाही, येशूला क्रुसावर चढवून मानवतावादाचं महत्त्व संपलं नाही, गांधीजींना गोळ्या घालून सत्य आणि अहिंसेचं मोल कमी झालेलं नाही, दाभोलकरांना गोळ्या घालून 'अंनिस'ची चळवळ थांबली नाही... उलट त्यांच्या बलिदानाचं स्मरण ठेवून ती दुप्पट जोमानं पुढं चालली आहे. धर्मचिकित्सेचा आणि शोषित-वंचितांचा लढा यापुढंही सुरूच राहील. पोपटाच्या शरीरात स्वतःचा जीव लपवून

ठेवणाऱ्या राजाची गोष्ट पुराणात आहे. खोलवर विचार करताना, थोडा आलंकारिकतेचा आधार घेऊन असं म्हणावंसं वाटतं, 'आपणही आपलं जीवन-अस्तित्व विचारांमध्ये सुरक्षित ठेवू या... म्हणजे या मारेकऱ्यांना कधी तरी हे उमजेल, की शरीरावर गोळी मारून हाती काहीच लागत नाही...!

सप्तरंग, सकाळच्या सौजन्याने

hamid.dabholkar@gmail.com

■■■

# दलित स्त्रियांची आत्मकथने : एक ऐतिहासिक दस्तऐवज

*माया पंडित*

महिला इतिहास शिक्षण जात-धर्म

व्यक्ती आणि समष्टी यांच्यातील गुंतागुंतीच्या नात्यांवरती समष्टीच्या अंतरंगातून प्रकाशकिरण टाकून, तिचे चिकित्सक समीक्षण करणारी आणि त्याचवेळी व्यक्तीच्या खासगी आयुष्याच्या व 'स्व'रूपाच्या जडणघडणीचे आकलन इतरेजनांसमोर सार्वजनिक रीतीने मांडणारी कृती म्हणजे आत्मकथन होय. अशी कृती एकाच वेळी व्यक्ती आणि समष्टीच्या जडणघडणीत सातत्याने कार्यरत असणाऱ्या, बहुविध आणि परस्परावलंबी प्रियांशी स्वत:च्या समूहाला आणि त्याचबरोबर वाचकालाही, जोडून घेत असते. एका दृष्टीने आत्मचरित्रे म्हणजे इतिहासाच्या विस्तीर्ण अवकाशातील एका विशिष्ट भूप्रदेशाचा स्थलकाल - संस्कृतीविशिष्ट असा जिवंत नकाशा उलगडणारे पथदीपच आहेत असे मानले पहिजे.

व्यक्तीव्यक्तींनी मिळून समाज बनतो असे वरकरणी जरी वाटत असले तरी ते खरे नाही. विशेषत: भारतासारख्या विविध जातीपातींनी बनलेल्या, माणसांचे जगणे निरनिराळ्या धर्मपंथरूढी परंपरांच्या पाशात करकचून बांधणाऱ्या आणि त्यांना उच्चनीचतेच्या स्तरांमध्ये कोंबून मारणाऱ्या देशात तर समाजाचा व्यक्ती विशिष्ट विचार अशक्यप्राय ठरतो. याचा अर्थ व्यक्ती इथे व्यक्ती म्हणून जगत नाहीत असा नाही; तर त्यांच्या व्यक्तीपणाला येणारा आकार हा व्यक्तीसापेक्ष बाबींच्या अनेक सामाजिक घटितांच्या बहुमेळी गुंफणीतून येत असतो आणि ती गुंफण ध्यानी घेतल्याशिवाय व्यक्तीचे व्यक्तीपण उमजत नाही, असा आहे. व्यक्तीची 'स्व'-रूपाची जाणीव आणि आत्मभान हे आंतरिक आणि बाह्य अशा अनेक घटकांमधून आकाराला येत असते. सामाजिकतेची संदर्भचौकट ही बाह्य मानली तर अंतर्मन, नेणीव आणि जाणीव घडणारी घटिते, मूल्यव्यवस्था भाषेपासून कौटुंबिकतेपर्यंत आणि लैंगिकतेपासून इच्छा-वासना-आकांक्षांपर्यंत स्थूल-सूक्ष्म रूपाने फैलावलेली असतात. व्यक्ती आणि समाज यांच्यामधले नाते हे किती सूक्ष्मांतिसूक्ष्म जिवंत धाग्यांनी विणले गेलेले आहे, याबद्दल आता खूप लिहिले गेलेले आहे. मुद्दा असा की आपले जीवन हे सामाजिक आणि खाजगी असा अनेक व्यूहक्षेत्रांमध्ये वितरित होत असते. आणि जाणता-अजाणता त्या व्यूहक्षेत्रांमधील गुंतागुंत आत्मनिवेदनातून वाचकाला सामोरी येत असते. म्हणूनच आत्मचरित्र लिहिणाऱ्या व्यक्तीला ते मान्य असो वा नसो, पण त्यातून एका व्यामिश्र जीवनाचे दर्शन घडते हे निर्विवाद.

'भारतात आत्मकथात्मक लेखनपरंपरा नाही; भारतात लिहिल्या गेलेल्या आत्मचरित्रांचे व्यवच्छेदक लक्षण सांगणे अवघड आहे; कारण त्यामधून निवेदनाच्या 'व्यक्ती' म्हणून जगलेल्या आणि खाजगी अनुभवांशी निगडित असलेल्या 'स्व'चे दिग्दर्शन होत नाही; भारतीयांचा कल 'स्व'च्या खाजगी जीवनातल्या गुंतागुंतीला वाचकांसमोर उलगडून मांडण्यापेक्षा अधिक 'स्व'च्या 'सार्वजनिक' अनुभवांना जाहीरपणे इतरांबरोबर वाटून घेण्याकडे असतो,' असे अनेक

तज्ञ मंडळींचं मत आहे. महात्मा गांधींचे सत्याचे प्रयोग हे त्याचे ठळक उदाहरण आहे. भारतात आत्मकथनात्मक साहित्याचा उदय उशीरा झाला आहे असेही काही लोक म्हणतात. कारण त्यांच्या मते इथल्या, भारतीय समाजाच्या आणि पाश्चात्य संस्कृतीच्या एकूण सांस्कृतिक जडणघडणीत फरक आहे. काही जणांनी याला आपली एक 'ऐतिहासिक उणीव' किंवा न्यून मानले आहे. कारण त्यांच्या मते आत्मकथनासाठी आत्मभान जागृत झालेली, 'स्व'ची प्रखर जाणीव बाळगणारी आणि आपल्या सामाजिक राजकीय अस्तित्वभानाने 'स्व' आणि 'इतर' यांच्या दरम्यानच्या अनुबंधांची, नात्यांची चिकित्सक मांडणी करणारी अशी व्यक्ती आवश्यक असते. आणि भारतात अशी व्यक्ती ब्रिटिश कालखंडापूर्वी, म्हणजे भांडवलशाहीच्या/साम्राज्यवादाच्या आगमनापूर्वी अस्तित्वात आलेली नव्हती.

या युक्तीवादामध्ये तथ्य असेलही पण याची सत्यसत्यता ऐतिहासिक दृष्टीने तपासून पहायला हवी. कारण हे 'स्व'भान तुकारामात, बहिणाबाईत दिसते. तसेच ते ब्रिटिश कालखंडापूर्वीच्या अनेक मौखिक परंपरांमध्येही थोडयाफार फरकाने वेगळया रूपाचे दिसते. (उदाहरणार्थ 'जनी म्हणे' अशी मौखिक सही असणे) मुख्य मुद्दा असा की भारतात आत्मकथनात्मक लेखनपरंपरा नाही हे विधान तपासून पहायला हवे. भारतात आत्मकथनाच्या परंपरा पाश्चात्य आत्मकथनपरंपरांपेक्षा वेगळया आहेत असे मला वाटते. जर असे असेल तर भारतात आत्मकथनात्मक लेखनाच्या परंपरा नेमक्या कोणत्या आहेत? आणि त्यांचा वेगळेपणा कशात आहे? आत्मकथन या सांस्कृतिक घटिताच्या नमनालाच घडाभर प्रश्न उपस्थित होतात. दलित स्त्रियांच्या आत्मकथनांकडे जाताना प्रथम या काही प्रश्नांची जाणीव मनात बाळगणे पूर्वतयारी म्हणून गरजेचे आहे. कारण या आत्मकथनांमधून आपल्याला वास्तवाकडे आणि परंपरेकडे पाहण्याचे ऐतिहासिक भान येते. किंबहुना ही आत्मचरित्रे म्हणजे या प्रश्नांना तावून सुलाखून घेण्याची एक ऐरण आहे असे मला वाटते. उदाहरणार्थ, जात, धर्म, वर्ग, लिंगभाव, पितृसत्ताक या सामाजिक घटितांमधून स्त्री पुरूषांचा 'स्व'भाव कसा घडतो? त्यांच्या उघड आणि छुप्या संकेतांमधून स्त्रियांचे खाजगी जीवन घरात आणि घराबाहेर कसे नियत होते? किंबहुना ब्राह्मण, शूद्र, शुद्रांतिशूद्र अशा सामाजिक उतरंडीच्या रचनेत त्यांच्या व्यक्तिमत्वांच्या जडणघडणी प्रस्थापितांच्या सत्तेला अनुकूल आणि अधिमान्यता देणाऱ्या होतील याची दक्षता प्रस्थापित संस्था-व्यवस्था कशा घेतात? त्यातून त्यांच्या लैंगिकतेचे कसे नियमन करतात? आणि महत्वाचे म्हणजे स्त्रियांमध्ये प्रतिकाराचे अंगार आणि आत्मभानाची स्फुल्लिंगे कोण चेतवितो?

सभोवतालच्या सत्ताजालाचा त्या कशा प्रकारे प्रतिकार करतात? त्यांच्या कोणत्या अनुभवांमधून प्रतिकाराच्या उर्जा तयार होतात? आत्मनिवेदनातून हे प्रगटीकरण कसे होते? अशा साऱ्या प्रश्नांची एक महामालिकाच आपल्यासमोर तयार होते. यांची सर्व उत्तरे थोडक्यात देता आली नाहीत तरी काही मुद्दे अधिक तपशीलाने विचारात घेता येतील. महाराष्ट्राबद्दल बोलायचे तर आत्मकथनांची नीट सलग परंपरा आपल्याला एकोणीसाव्या शतकापासून दिसते हे खरे आहे. आणि ही परंपरा स्त्रियांच्या आत्मकथनांबद्दल बोलायचे तर मजबूत आहे. दलित स्त्रियांच्या आत्मकथनांचा विचार करताना मराठीतली स्त्री आत्मकथनात्मक लेखनाची परंपरा काय आहे. स्त्रियांनी आत्मचरित्रे का लिहिली? या आत्मचरित्रांनी नेमके स्त्रियांच्या कोणत्या जगांमधील जगण्याच्या अनुभवांचे दिग्दर्शन केलेले आहे? त्यातले आत्मभान आणि त्या परंपरेचे 'स्व'रूप दलित स्त्रियांनी आपल्या ऐतिहासिक जाणिवेतून कसे बदलले आहे? याचा थोडका आणि धावता विचार मी यापुढील विवेचनात करणार आहे. अर्थातच दलित स्त्रियांची आत्मकथने आणि दलित पुरूषांची आत्मकथने 'स्व'रूपाने भिन्न आहेत का, दलित स्त्रियांच्या आत्मभानाचे आविष्करण आणि अन्य भारतीय वा परकीय भाषांमधील स्त्रियांच्या तत्सम लेखनात काही साधर्म्य आणि फरक आहे का, त्यातील दलित स्त्री म्हणून जी जाणीव आहे तिचे स्वरूप आणि राजकीय आकलन काय आहे; असेही प्रश्न उपस्थित होतात.

मराठीतले अगदी सुरूवातीचे आत्मकथात्मक निवेदन म्हणून काशीबाई कानिटकरांच्या 'माझे शिक्षण'चा विचार करावा लागेल. मीरा कोसंबी यांच्या मते हे मराठीतले पहिले आत्मकथन असावे, काशीबाईंच्या आत्मचरित्रात्मक लेखनाची रचना झाली ती आपल्या आयुष्यातील काही प्रसंग काशीबाईंनी सांगावेत असा आग्रह तरूण नातेवाईकांनीं केला म्हणून. त्यामुळे हे आत्मकथन लिहिले गेले ते 1921 ते 1948 एवढया प्रदीर्घ काळात. काशीबाईंनी स्वत:बद्दल

बोलताना शिक्षणाच्या आठवणी सांगाव्या हे महत्वाचे आहे. 'लेखन' हे देखील प्रस्थापितांच्या प्रतिकाराचे शस्त्र आहे ही जाणीव आली ती मुळात 19व्या शतकातल्या शिक्षणातूनच.

शिक्षण ही एक अद्भूत गोष्ट आहे आणि ती आपल्याला आपल्या जगाबद्दल बोलायचे सामर्थ्य देते, ही जाणीव जशी काशीबाईच्या नव्या आत्मभानात दिसते तशी ती त्यांच्याच समकालीन रमाबाई रानडे यांच्याही आत्मकथनात दिसते. (आणि पुढे बेबी कांबळे आणि आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांचा शिक्षणावरचा कटाक्ष आणि जोर, दलित आणि दलितेतर स्त्रियांच्या मधला एक समान दुवा आहे). महर्षि कर्वेच्या पत्नी बाया कर्वे, सर मोरोपंत जोशी यांच्या पत्नी यशोदाबाई, काशीबाईच्या बहीण पार्वतीबाई आठवले आणि लक्ष्मीबाई टिळक यांच्याही लेखनात शिक्षण हा त्यांच्या अनुभवांना एक मोठाच टप्पा आहे हे जाणवते.

मराठीतल्या या सुरूवातीच्या आत्मकथनांमागील प्रेरणा मात्र निरनिराळया आहेत. रमाबाई आणि यशोदाबाई आपल्या पतींचे गुणवर्णन करण्यासाठी आपापल्या आयुष्यातील काही आठवणी सांगतात. पार्वतीबाई शिक्षणाचा आणि समाजसेवेच्या क्षेत्रात विधवांनी उतरावे म्हणून आपल्या जीवनाच्या त्यांना प्रोत्साहित करणाऱ्या अशा काही भागांचा आढावा घेतात. लक्ष्मीबाईनी लिहिलेले आत्मचरित्र मराठीतले एक विलक्षण संचित आहे. त्यांनी ते लिहीले त्याचे कारण असे की त्यांच्या मुलाला रेव्हरंड टिळकांचे चरित्र लिहायचे होते आणि आपल्या आईने त्यांच्याबद्दलच्या आठवणी लिहिल्या तर त्यांचा उपयोग होईल, अशी त्याची धारणा होती. ते तर काही त्यांच्या हातून लिहून झाले नाही पण लक्ष्मीबाईनी जे लिहिले त्यातून मात्र त्या काळच्या ब्राह्मण वर्गाची इतरांवरील मिरासदारी आणि अहंमन्यता, त्यांची सत्तावंत परकीयांच्या पायी लोळण घेण्याची क्षुद्र वृत्ती, त्यांच्या पितृसत्ताक व्यवहारातून स्त्रियांच्या वाटयाला येणारा कौटुंबिक हिंसाचार आणि दडपणूक, साम्राज्यवाद आणि इथले प्रस्थापित यांच्या सत्ताकारणात 'धर्मांतरण' या सांस्कृतिक राजकारणाचा वाटा, आणि मिशनरी वर्गाच्या अंतर्गत वाहणाऱ्या धार्मिक सत्ताकारणाचे साम्राज्यवादी आणि जातीय अंतरंग उलगडून दाखविण्याची हातोटी आणि या सर्व बाबींना एका ऐतिहासिक परिघात आणणारी विलक्षण विनोदबुद्धी यांची जिवंत बेरीज आढळते. लक्ष्मीबाई सोडल्या तर या सर्व आत्मचरित्रांमधून या स्त्रिया स्वत:ला फारसे महत्व देत नाहीत. आपला पती आपल्यापेक्षा कितीतरी थोर आहे आणि त्याच्यासमोर आपण क:पदार्थ आहोत, स्वत:बद्दल कमीपणाची भावना त्यांच्या 'स्व'चे व्यवच्छेदक लक्षण आहे. मराठी आत्मचरित्रांच्या परंपरेत विसाव्या शतकात उल्लेख कराव्या अशा विविध उच्चवर्णीय स्त्रियांच्या आत्मकथनांची मालिका आहे. उदाहरणार्थ, आनंदीबाई शिर्के यांचे 'सांजवात', काशीनाथ घाणेकरांच्या पत्नीचे, कांचन घाणेकरांचे 'मला काही सांगायचंय', हंसा वाडकर यांचे 'सांगत्ये ऐका', बालकवींच्या पत्नीचे 'आत्मकथन', मल्लिका अमर शेख यांचे 'मला उद्धस्त व्हायचंय', ते सुनिता देशपांडे यांच्या 'आहे मनोहर तरी'पर्यंत अनेक. सुरूवातीची आत्मकथने बहुशा पतीकेंद्री होती तर ही आत्मकथने देखील एका वेगळ्या अर्थाने पतीकेंद्रीच आहेत. कारण सांजवातचा अपवाद वगळता त्यांचे स्वरूप प्रामुख्याने पतीसोबतच्या सहजीवनात सोसलेल्या दु:खांची वाचकांसमोर मांडलेली कैफियत असे आहे.

लक्ष्मीबाई टिळकांच्या, रमाबाईच्या आत्मचरित्रांमध्ये त्यांच्या खाजगी जीवनाची कधी सडेतोड तर कधी सौम्य चिकित्सा काही प्रमाणात क्वचितच दिसते. त्यामानाने ही आत्मचरित्रे खूपच निर्भिड आहेत. कैफियतीच्या अंगाने मांडलेल्या या स्मृतिबंधांमध्ये दृग्गोचर होते ते विश्व मध्यमवर्गीय, उच्चवर्णीय आणि बऱ्यापैकी सुस्थित स्त्रियांचे आहे. कुटुंबात सोसलेल्या अडचणी, उंबरठ्यावर भंग पावलेली स्वप्ने, घरभिंतींनी बाहेरील दिशांचा केलेला संकोच, स्वत:ला मिळालेला दुय्यम दर्जा आणि पतीच्या/कुटुंबाच्या असमंजसपणामुळे सोसलेला शारिरीक आणि मानसिक त्रास....इत्यादी तथाकथित खाजगी बाबींबद्दल, बाबत ही आत्मचरित्रे पुरूषांच्या तुलनेत बरीच खुली मांडणी करतात. अर्थात म्हणून त्यांच्या लिखाणाचे महत्व कमी आहे असे नाही, कारण त्यातून मध्यमवर्गीय उच्चवर्णीय कुटुंबातल्या पितृसत्ताकतेचे आपले आकलन अनुभवविश्वांच्या स्तरावर वाढते. पण त्याचबरोबर त्यांचे महत्व यासाठी आहे की त्यातून महाराष्ट्रातल्या स्त्रीमुक्ती चळवळीच्या स्त्री प्रश्नांच्या समजेचे, आकलनाचे आणि तिने अनुसरलेल्या मार्गाच्या मर्यादांचे ऐतिहासिक भान आपल्याला येते. कारण पितृसत्ताकता आणि तिचे अन्य वर्ग, जात, धर्म आणि भांडवली

दमनयंत्रणाशी असलले संबंध, ज्यातून लैंगिकतेचे ढाचे प्रस्थापित होतात, आणि स्त्रियांमध्ये असमान सत्तासंबंधातल्या उतरंडी रचल्या जातात, त्याबाबत अनुभव आणि आकलनाच्या पातळीवर फारसे काही हाती लागत नाही. विसाव्या शतकातल्या या आत्मचरित्रांमध्ये स्त्रीवादी अभिनिवेष आणि प्रतिकारी जाणीव प्रत्ययाला येते खरी पण या जाणिवेची नजर आपल्या जातीय वास्तवाच्या सीमा ओलांडून गावकुसाबाहेरच्या अमानुष वास्तवात किंवा धार्मिक विद्वेषाच्या विखारी वातावरणात होरपळत घडत जाणाऱ्या बाईच्या जगण्याकडे क्वचितच गेलेली दिसते.

आधुनिकतेने जो बदल आणला त्यात स्त्रियांच्या दमनाचे नवे मार्ग तयार झाले पण त्याचबरोबर मध्यमवर्गीय स्त्रियांना दमनव्यवस्थांबरोबरच झगडा करण्याचे बळ मिळाले हेही खरे आहे. मात्र आपले प्रश्न हे जणू सर्व स्त्रियांचे प्रातिनिधिक आहेत असा एक समज तिथे दिसतो. आपणही धर्म-जात-वर्गाच्या, आधुनिकतेच्या, सामाजिक-आर्थिक पातळीवर सत्तावंत गटात आहेत आणि आपल्यापेक्षा खालच्या वर्गीय, जातीय इत्यादी पातळीवरील स्त्रियांच्या दमनाला आपलाही हातभार या न त्या प्रकारे, जाणता - अजाणता लागलेला असतो, अशी सत्तासंबंधांचे आणि स्वत:चे परखड विश्लेषण करणारी कठोर राजकीय जाणीव तेथे दिसत नाही. उदाहरणार्थ, मध्यमवर्गीय आणि उच्चजातीय कुटुंबातल्या पितृसत्ताकाचे वा हिंसाचाराचे, वा कायद्याचे विश्लेषण करताना दलित, कामगार, कष्टकरी, मुस्लिम, आदिवासी अशा अनेक प्रकारच्या स्त्रिया आहेत आणि त्यांच्या जगण्यात त्यांना सोसाव्या लागणाऱ्या हिंसाचाराशी या साऱ्या व्यवस्थांचा संबंध आणि आपले जगणे त्याच्याशी कुठेतरी जोडून पाहिले पाहिजे, अशी भूमिका अभावाने दिसते. मग वाचकांच्या सार्वजनिक नजरेला उठून दिसतो तो त्यातील चमकदार ‘परफॉरमन्स'. या परफॉरमन्समध्ये ‘जात' नावाची काही गोष्ट असलीच तर ती आपल्याला लागू होत नाही. ती काहीतरी खालच्या समाजातल्या लोकांची बाब आहे, अशी समजूत दिसते. आपण जातीबितीच्या पलिकडे गेलेल्या आहोत; म्हणून त्यांचे जगणे जातींनी बांधलेले, जुनाट; आधुनिकतेचा स्पर्श न झालेले आणि आपले आधुनिक, कारण आपण जातिबितीच्या पलिकडे कारण आपण आधुनिक! पण तरी देखील आपले जगणे मात्र सर्व स्त्रियांचे भगिनीभावाने प्रतिनिधित्व करणारे असा अभिनिवेश! मला या आत्मचरित्रांची निंदा वा चेष्टा मुळीच करायची नाही. त्यातून बाईच्या जगण्याचे येणारे आत्मभान काळाच्या त्या बिंदूवर महत्वाचे होते पण थोडे अपुरे, अप्पलपोटे आणि काही वेळा मतलबी होते असे मला वाटते. पण त्यांचे ऐतिहासिक महत्व म्हणून कमी होत नाही.

या ‘वेगळे'पणाच्या पार्श्वभूमीवर आपल्याला दलित स्त्रियांच्या आत्मचरित्रांकडे पहायला हवे. या आत्मचरित्रांमध्ये आपापल्या जातींच्या वेगळेपणाचा साजरा उत्सव या बायांनी मांडलेला नाही. हे पहिल्यांदा लक्षात घ्यायला हवे. ही आत्मचरित्रे एक प्रखर राजकीय जाणीव घेऊन आपल्याला सामोरी येतात. दलित पुरूषांनी लिहिलेली आत्मचरित्रे आणि दलित स्त्रियांची आत्मचरित्रे यात एक महत्वाचे साम्य आहे. त्यांची ही राजकीय जाणीव प्रस्थापित आणि प्रतिकारी अशा अनेक पातळयांवरच्या अनेक सत्ताकारणांचा सामना करते. पण मध्यमवर्गीय स्त्रियांनी लिहिलेल्या आणि दलित पुरूषांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांमध्ये एक गोष्ट समान आहे. ती म्हणजे भारतीय वास्तवात दलित स्त्रीच्या लढाऊ आयुष्याचे आकलन करण्यात त्यांची राजकीय जाणीव कमी पडते.

लढाऊ दलित पुरूष आणि स्त्रीमुक्ती चळवळीच्या झुंझार स्त्रिया-दोघेही दलित स्त्रीचे कर्तृत्व नाही म्हटले तरी दृष्टीआड करतात. एकीकडे मध्यमवर्गीय नजरेचा कोतेपणा तर दुसरीकडे बाईला दुय्यम लेखणारी दलितांमधील पुरूषसत्ताकता! त्या पुरूषसत्ताकतेचे स्वरूप उच्चवर्णीय समाजातल्या पुरूषसत्ताकतेपेक्षा थोडे निराळे असले तरी दलित लेखकांचे आत्मभान पुरूषसत्ताकता नाकारत नाही. दलित पुरूष आत्मचरित्रांनी मराठीतल्या आत्मचरित्रलेखनाला नवे आयाम दिले हे खरे पण दलित बाईच्या शोषणाचे विविध ढाचे अंतर्बाह्य ओळखून त्याविरूद्ध उभ्या राहणाऱ्या दलित पुरूषाचे आत्मभान त्यात आलेले नाही, हेही खरे आहे. दलित पुरूषांनी देखील स्त्रियांचा विचार धर्म, वर्ग, जात, लिंगभाव या कोटींच्या संदर्भात, अर्थव्यवस्था आणि आधुनिकता यांच्या अक्षांवरती, आई म्हणून, बायको म्हणून, मैत्रीण म्हणून, नुसतीच बाई म्हणून आणि चळवळीतली खांद्याला खांदा लावून लढणारी सहकारी म्हणून तोकडाच केलेला आहे, याकडे मी आपले लक्ष वेधते. सर्वात महत्वाचे म्हणजे ‘दलित म्हणजे लढाऊ' हे राजकीय भान स्त्रियांच्यामध्ये जितक्या

तीव्रतेने दिसते, तितके ते पुरूषांच्या आत्मचरित्रात दिसत नाही आणि स्त्रियांबरोबरच्या त्यांच्या -समज-व्यवहारातही दिसत नाही. उच्चवर्गीय व उच्चवर्णीय स्त्रियांसाठी 'आपण पुरूषसत्ताकतेचे 'बळी' आहोत'; आणि दलित पुरूषांना 'आपण जातीव्यवस्थेचे बळी आहोत' ही भावना त्यांचे अस्तित्व भान घडवणारी मध्यवर्ती विचारप्रणाली वाटते, असे त्यांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांवरून दिसते.

दलित स्त्रिया आत्मचरित्रे लिहितात तेव्हा त्यांची भूमिका निराळी दिसते. दलित स्त्रियांची अनेक आत्मकथने आज मराठीत आहेत. बेबी कांबळे यांच्या 1984 साली प्रकाशित झालेल्या 'जिणं आमुचं' पासून ते उर्मिला पवारांच्या 2001 सालच्या 'आयदाना'पर्यंत (आणि नंतरही) अनेक दलित स्त्रियांनी आपली आत्मचरित्रे लिहिली आहेत. शांताबाई दाणींचे 'रात्रंदिन आम्हा...', कुमुद पावडेंचे 'अंतस्फोट', मुक्ता सर्वगोड यांचे 'मिटलेली कवाडे', शांताबाई कांबळेंचे 'माझ्या जल्माची चित्तरकथा', जनाबाई गिर्हे यांचे 'मरणकळा', विमल गोरे यांचे 'तीन दगडांची चूल' इ. नागपूर-वर्ध्यापासून सांगली-कोल्हापूरपर्यंत आणि कोकणपट्टीपासून ते मुंबईपर्यंत महाराष्ट्राच्या अक्षांश-रेखांशात पसरलेल्या महार, गोपाळ, गोंधळी, डोंबारी अशा विविध जाती-जमातींमधील दलित स्त्रियांनी आत्मकथने लिहिली आहेत. महाराष्टातील आत्मकथनपर निवेदनपरंपरेत ही आत्मचरित्रे म्हणजे मैलाचे दगड मानायला हवीत. या ठिकाणी मला एक गोष्ट स्पष्ट करायला हवी: प्रत्येक दलित स्त्री आत्मचरित्राबद्दल मी बोलणार नाही, तर त्यातल्या आत्मभानाबद्दल मांडणी करणार आहे.

दलित स्त्रियांच्या आत्मकथनांमधली बाई एक लढाऊ समज घेऊन आलेली दिसते. ही समज तिच्या सभोवतालच्या जगण्याच्या संघर्षातून तयार होते, तिच्या जातीच्या बरोबर तिच्या तादात्म्यातून तयार होते आणि त्याचबरोबर जात्यंताशिवाय दु:खांत नाही आणि मानुष जीवनात जीवनात जगता येणार नाही, या आंबेडकरी आणि बुद्धवादी विचारांच्या मुशीतूनही ती तयार होते. या सर्व स्त्रियांचे लिखाण एका क्रांतिकारी उर्जेने भारलेले आहे. ही उर्जा या आत्मभानाचा लुघत्तम साधारण विभाज्य आहे. आपण या अमानुष समाजात बदल घडवून आणणाऱ्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी जाग्या झालेल्या परिवर्तनाच्या क्रांतीशिवाय आहोत, अशी भूमिका असलेले हे आत्मभान आहे. आपल्या बळी असणाऱ्या, नि:सत्व करून सोडणाऱ्या, (स्त्री म्हणून, श्रमिक म्हणून आणि खालच्या जातीच्या आहोत अशा) तिहेरी दुय्यमत्वाच्या भावनेच्या अंकित राहून हे लिखाण झालेले नाही. 'जग बदल घालुनी घाव, गेले सांगून मला भीमराव' असे म्हणत समाज बदलायला पदर बांधून उठलेल्या रणरागिणीचा लढाऊ बाणा हा या आत्मचरित्रांचा कणा आहे.

हे आत्मभान नेमक्या कोणत्या प्रकारची राजकीय समज दाखविते? दलित स्त्रियांच्या आत्मचरित्र लिहिण्याच्या मागील प्रेरणा पाहिल्या तर असे दिसते की या स्त्रिया आपल्या जातीचे 'घडणे' विस्ताराने मांडतात. उदाहरणार्थ मुक्ता सर्वगौड यांना जेव्हा यदुनाथ थत्ते यांनी आत्मचरित्र लिहायला सांगितले तेव्हा त्यांना हसू आले. 'स्वत:चे आयुष्य वाचकांच्या समोर प्रदर्शित करणे हे आत्मचरित्राचे कार्य नाही तर आपल्या व्यक्तिगत आयुष्यातल्या अनुभवांच्या मांडणीतून दलित समाजाचे आयुष्य चिकित्सक नजरेतून समाजासमोर मांडणे' हा त्यांचा हेतू आहे. कुमुद पावडेंना आपले लिखाण आत्मचरित्रात्मक वाटत नाही, तर 'जुलमी जाती/धर्मव्यवस्थेची प्रखर टीकात्मक मांडणी' वाटते.

बेबी कांबळे यांचे 'जिणं आमुचं' हे आत्मचरित्र त्यांनी मुळात का लिहिले यामागची ऐतिहासिक कारणमीमांसा देताना त्या म्हणतात: माझे लेखन हे माझ्या लेकी-सुना, पोरीबाळी आणि पुढच्या पिंढयांसाठी आहे. आपण महार असण्याबद्दल लाज शरम वा कमीपणा का बाळगायचा? आपल्या महार रक्तातले क्रांतिकारी सत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने कसे जागे झाले, प्रस्थापितांबरोबर कसे लढू लागले. याच्या प्रेरक आणि स्फूर्तिदायक आठवणी मला पुढच्या पिढयांना सांगायला हव्यात, म्हणजे हे तेजही एका पिढीपासून पुढच्या पिढीपर्यंत सांमित होईल. इथे आत्मचरित्रांमागच्या नव्या भूमिका, एक नवी विजिगीषु परंपरा आणि परिवर्तनाच्या लढयातून स्त्रियांना आलेले स्वत:च्या स्त्री पणाचे क्षमतेचे ओजस्वी भान अख्ख्या समाजाला घेऊन व्यक्त होते. लढयाची ऐतिहासिक आठवण तरूण दलित पिढीच्या स्मृतीमध्ये ठामपणे टिकवून ठेवली तरच लढाऊ परंपरा जिवंत राहील ही जिद्द प्रखरपणे व्यक्त होते.

आणखी एक आत्मचरित्रातून आलेली पण त्यांच्या मुलाखतीमध्ये त्यांनी सांगितलेली एक बाब प्रतिकारी सांस्कृतिक जाणिवेची निदर्शक म्हणून मला आपल्यासमोर ठेवणे मला फार महत्वाचे वाटते. आपल्याला माहित आहे की, बेबीताई आपले आत्मचरित्र सतत सतरा-अठरा वर्षे लिहित होत्या. (हे दमनाचे एक उदाहरणच आहे. कारण आपण लिहीतो हे दुसऱ्याला कळले तर बाई लिहीते म्हणून मुलांपासून शेजारपाजाNयांपर्यंत नावे ठेवून घ्यावी लागतील, नाचक्की होईल, कदाचित पतीचा मारही खावा लागेल अशी भीती!)

तर ते त्यांनी मुळात लिहायला का घेतले? त्यांचे किराणा मालाचे दुकान होते. आणि मोकळ्या वेळात, गिऱ्हाईके नसताना, रद्दी कागद वाचत बसणे हा त्यांचा छंद. रद्दीत जुनीपानी गोष्टींची पुस्तके येत. अशीच एकदा त्यांनी पुस्तकात तुळशीविवाहाची कथा वाचली. कृष्णभक्तीत हरवून गेलेल्या तुळशीच्या आपल्या उपास्य दैवताबरोबर झालेल्या विवाहाची गोष्ट वाचून त्या भयंकर अस्वस्थ झाल्या. हे खरे नाही; खरी गोष्ट वेगळीच आहे आणि ती भटाबामणांनी दडपून टाकून त्यावर हे कृष्णभक्तीचे खोटे अवडंबर रचले आहे म्हणून मला ते लिहिले पाहिजे, असे म्हणून त्या आपल्या आठवणीतल्या गोष्टी लिहित्या झाल्या.

तुळशी ही मुळातली वृंदा. जालंदर नावाच्या एका शूरवीर आणि न्यायी दलित राजाची लाडकी राणी. जालंदराने राज्य उत्तम चालवले होते हे देवांना सहन होईना. म्हणून त्यांनी त्याच्याशी युद्ध आरंभले. पण त्याचे शौर्य आणि तिचे प्रखर पातिव्रत्य यांच्यामुळे त्याचा पराभव करणे देवांना अशक्य झाले होते. तिच्या लहानपणी भूलथापा मारून नारदाने तिला एक विष्णूमूर्ती दिली होती आणि हिची पूजा कर म्हणून सांगितले होते. जालंदराला हरवायचे असेल तर तिचे पातिव्रत्य भंग करायला हवे असा विचार करून विष्णू तिच्याकडे जालंदराच्या रूपात गेला आणि आपल्याबरोबर देवाकडून असे कपट होईल याची सुतराम शंका नसलेली ती नेक स्त्री त्याला बळी पडली. त्याच क्षणी जालंदराचे मस्तक तिच्या मांडीवर येऊन पडले. तिच्या लक्षात आपली फसवणूक आली आणि ती संतापली. मग विष्णूने तिला 'आशीर्वाद' दिला की 'यापुढे तू कुमारी राहशील आणि तुझे लग्न दरवर्षी माझ्या कृष्ण अवताराबरोबर होईल.' म्हणून तुळशी विवाह होतो आणि कृष्णाजवळ सागरगोटयाच्या रूपाने जालंदराचे मस्तकही साक्षीला ठेवलेले असते. शिवाय वृंदेचे स्थान घरात नाही तर बाहेर, म्हणून तुळस दाराबाहेर असते. म्हणजे फसवणूक, दांभिक कपट आणि अवहेलना अशी तिहेरी अनीती वाट्याला. 'आपल्या भोवतालच्या वातावरणातले हे नीच सांस्कृतिक सत्ताकारण आपल्याला लक्षात घेतले पाहिजे आणि खरा इतिहास स्मृतीत जागविला पाहिजे ' अशी ही भूमिका आहे. ती दलित स्त्रीवादी जाणीव आहे. ही सांस्कृतिक राजकीय जिद्द घेऊन त्यांनी लेखनाला सुरूवात केली. 'माझे दु:ख माझे व्यक्तिगत नाही तर माझ्या समाजातल्या लोकांचे आहे, ते जातीव्यवस्थेने लादलेल्या गुलामगिरीच्या व्यवहारातून व मानसिकतेतून तयार झाले आहे. म्हणून गुलामगिरीव्यतिरिक्त दुसरे हाती काही नसणार. आपला पुरूषही आपल्यावर अत्याचार करायला प्रवृत्त होतो' अशी पुरूषसत्ताकतेची समज आहे, पण त्या अन्यायाचा शबल स्वीकार नाही; तर हे बदलायला हवे ही प्रेरणा त्यात आहे.

आपल्या समाजाच्या या अवस्थेतून आपल्याला बाहेर काढणारी चीज आहे शिक्षण; आणि एकूण एक दलित स्त्रियांच्या आत्मभान जागृतीत शिक्षण हा घटक फार महत्वाचा आहे. (हेच 19व्या शतकातल्या स्त्रियांच्या बाबतीतही खरे आहे. पण आधुनिकतेने त्यांना शिक्षणाची दारे खूप अगोदर उघडी केली होती.) दलित स्त्रियांना हे दालन खुले होण्यासाठी शाहू, फुले आणि आंबेडकर असूनही शतकभर वाट पहावी लागली. जनाबाई गिर्हे वडिलांच्या जिद्दीमुळे शाळा शिकल्या; जातीतील स्त्रियांच्या विरोधाला न जुमानता ती बिकट वाट त्यांनी चोखाळली, शांताबाई कांबळेच्या आई मरताना त्यांच्या वडिलांना मुलीचे शिक्षण पूर्ण करा असे सांगून गेल्या. उर्मिला पवारांना प्रथम त्यांच्या वडिलांनी आणि म्हणून नंतर आईने शाळेत जाण्याची सक्ती केली. (उर्मिला पवारांच्या आईने आपल्या पोरीचे शिक्षण अवघड करणाऱ्या एका मारकुटया मास्तराला भर रस्त्यात शिकवलेला 'धडा' तर शिक्षणशास्त्रीच्या सर्व पाठयपुस्तकांमधून लावावा इतका उत्तम आहे!)

या सर्व आत्मचरित्रांमधून विशेषत: स्त्रियांची स्वत:च्या, आणि आपल्या मुलाबाळांच्या शिक्षणाबाबतची ओढ उल्लेखनीय आहे. प्रतिकाराची विवेकनिष्ठ उर्जा तयार करणारे शिक्षण हे उत्तम इंधन आहे, हे त्या जाणतात. अंधश्रद्धा, खोटया धर्मकल्पना, अन्याय्य रूढी आणि प्रस्थापितांना आव्हान देण्यासाठी शिक्षणाला पर्याय नाही. अर्थात हे सांगण सहजगत्या झालेले नाही. जवळपास प्रत्येक स्त्री दलित आत्मचरित्रात शिक्षण, स्त्रिया, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, खोटया धर्मकल्पना, अन्याय रूढी आणि त्याने मनात ठोकून ठाकून रूजवलेले विटाळ कल्पनांचे, शुद्धातशुद्धतेच्या कल्पनांचे भयावह जाळे, यांबद्दलच्या समाजांतर्गत झडलेल्या चर्चा नोंदविल्या आहेत. मानसिक गुलामगिरी तोडणे सोपे नाही, पण स्त्रियांनी ते आव्हान पेललेले आणि तडीस नेलेले दिसते. त्यातल्या अडचणींवर मात करण्यासाठी शोधलेले मार्गही खरोखरी प्रेरक आणि अंजन घालणारे आहेत. कणगीतले दाणे विकून, उपाशी राहून, नवऱ्याचा मार खाऊन, समाजाकडून झालेल्या अपमानांना पाठीमागे टाकत बायांनी पोरांना शिकविले.

भूक, उपासमार, जातीच्या श्रमविभागातले विषमतेचे सत्ताकारण, बायकांच्या वाट्याला आलेले अविरत काम, हिंसाचार आणि वंचना, पोलीस आणि वरिष्ठ वर्गीय यांच्याकडून सातत्याने होणारे आरोप आणि अत्याचार, राजकीय नेत्यांच्या तोंडच्या लोकशाहीच्या/समानधिकारांच्या मोहक शब्दांच्या अवगुंठनामागले सत्ताबाज कावे. याविरूद्ध लढण्याचा एल्गार करताना या स्त्रिया या साऱ्या शर्मनाक बाबी लेखनाच्या वेशीवर टांगतात. पण सर्वात महत्वाचे म्हणजे दलित स्त्रियांच्या दृष्टीकोनातून भारतात स्वातंत्र्योत्तर काळात आलेली आधुनिकता नेमकी कशी आहे, याचे विदारक चित्रण स्त्री दलित आत्मचरित्रांमधून येते. बौद्धपूर्व बालपणीचा सुखाचा नसलेला आणि तरीही ओठांवर हसू आणणारा काळ, लहान मुलांचे खेळ, लग्नाच्या वेळचे उखाणे, गमतीजमती, खाण्यापिण्याच्या जुन्या सवयी आणि नव्या रीती. अन्नाची पूर्वी नसलेली व आता असलेली उपलब्धता, भूकेचा सामना करण्याचे विविध मार्ग, कपडे आणि पेहरावात व एकूणच राहणीमानात झालेले बदल, लैंगिकतेच्या कल्पना, कुटुंबांतर्गत हिंसाचाराचे बदललेले रूप, नागरी जीवनात झालेले परिवर्तन, खेडी सोडून शहराकडे आलेल्या माणसांना मुंबईच्या बकाल वातावरणात रहाताना कराव्या लागणाऱ्या विविध तडजोडी, आणि अंतर्भावांच्या-बहिष्कृतींच्या नवनव्या क्षेत्रव्यूहांचे पदापदी येणारे आणि चावून टाकणारे प्रत्यंतर! याचे अतिशय प्रत्ययकारी चित्रण उर्मिला पवार आणि इतर अनेक दलित स्त्रिया करतात.

आधुनिक काळात जात सार्वजनिक जीवनातून वरकरणी अदृश्य आणि अलगद 'खाजगी' झाली.पण तिचे आर्थिक दमनाच्या संरचनेशी असलेले नाते अधिक गडदही झाले. बकाल झोपडपट्ट्यांत गटारांच्या कडेने रहाणारी, कामगार म्हणून राबणारी, भांडवलशाहीच्या विक्राळ चक्रात भरडून निघणारी माणसे आणि झपाटयाने संघटित क्षेत्रांमधून असंघटित क्षेत्रात फेकलेल्या आणि आता व्यक्तिगत पातळीवर घरगुती व्यवसाय फक्त करू शकणाऱ्या स्त्रिया हे त्याचे उत्तम उदाहरण आहे.

सांस्कृतिक अस्मितेच्या राजकारणाचे भांडवल करणाऱ्या पुढारी मंडळींच्या नजरेस ते पडत नाही. चळवळींनी मोठया अभिनिवेशाने आणलेल्या राजकारणातून दलित स्त्रियांचे सीमांतीकरण होणे हे अंतिमत: घातक आहे. मात्र तरीही दलित स्त्रिया आपली जिद्द सोडत नाहीत. जातीला 'खाजगी' जगाच्या पडद्याआड नजरअंदाज करणारे तथाकथित उच्चवर्णीय आणि 'पूर्वाश्रमीच्या कनिष्ठ जातीय पण आता 'सुधारलेल्या' मंडळींचे कसब त्या 'सार्वजनिक' जगाच्या वेशीवर टांगतात. आणि त्यातल्या राजकारणाचे वाभाडे काढतात. स्वभाषेची लाज न बाळगता तिला अभिमानाने सांस्कृतिक व्यवहारात प्रस्थापित करतात. मात्र त्याच वेळी कौटुंबिकतेच्या क्षेत्रव्यूहात नामकरण, मंगळसूत्र आदि मार्गाने येणाऱ्या तथाकथित पितृसत्ता पुन्हा रूजविणाऱ्या 'सुधारणा', धर्माचे/विधींचे नव्या रूपातले जुने ढाचे आपल्याला पुन्हा पुन्हा त्याच भीषण चात तर ढकलणार नाहीत याची रास्त भीतीही त्या नोंदवतात.

इथे जाता जाता एका बाबीचा उल्लेख करायला हवा. नरेंद्र जाधवांच्या आत्मचरित्रात त्यांच्या अमेरिकेतल्या दिवाणखान्यात एकेकाळी बाबासाहेबांच्या आदेशानुसार टाकून टाकून दिलेले जुने देव पुन्हा मांडणारी कन्या आहे आणि तिला ते देव आपल्याकडे कनवाळू नजरेने पाहताहेत असे वाटते. अर्जुन डांगळे यांच्या पुस्तकासाठी लिहिलेल्या लिखाणात बाबुराव बागुलांनी असे म्हटले आहे की, 'भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीचे रूपांतर एका नव्या

मिथ्यकथेमध्ये करण्यात आले आणि त्याच्या परिणामी परिवर्तनाच्या इतर साऱ्या चळवळी दुय्यम ठरवल्या गेल्या.' आता बाबासाहेबांची जात्यंताची चळवळ पुन्हा नव्याने दुय्यम ठरते आहे काय? जागतिकीकरणाच्या काळात मानवी हक्कांच्या परिभाषेमागे लपूनछपून तेच छद्मी राजकारण पुन्हा परत वर येत नाही ना? असा प्रश्न विचारायची वेळ आली आहे. एखाद्या जंगलातल्या सावजावर उडी मारायला दबा धरून बसलेल्या श्वापदासारखी जात लपून बसलेली आहे, हा उर्मिलांनी दिलेला इशारा अर्थगर्भ होतो.

महाराष्ट्रीय दलित स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांची तुलना अन्य भाषांमधील आत्मचरित्रांशी केली तर काय दिसते? बामा यांचे करक्कू (1992) हे पहिले दलित आत्मचरित्र महत्वाचे आहे. दलित ख्रिश्चन बाईच्या नजरेतून बामा यांनी केलेली चर्चच्या धार्मिक 'राजकारणाची चिकित्सा', तमिळ व अन्य कोणत्याही भाषेत इतक्या समर्थपणे पहिल्यांदाच आली. हीन समजल्या गेलेल्या, 'परायार' या खालच्या जातीत जन्माला आलेल्या या मुलीला शिक्षणाचा मार्ग चर्चने दाखविला खरा. पण जेव्हा ख्रिस्ताने दाखविलेल्या समाजसेवेच्या मार्गावर 'नन' बनून बामाने पहिली पावले टाकायला सुरूवात केली, तेव्हा तिच्या लक्षात आले की याही धर्माच्या व्यवहारात दलितांबद्दलचा आकस आणि तिरस्कार ओतप्रोत भरला आहे. चर्च दलितांना ख्रिस्ताच्या शिकवणीनुसार विनम्र, गरीब, सोशीक वगैरे बनायला सांगते ते त्यांच्यावर दंडेली करता यावी म्हणून! क्षणोक्षणी उपेक्षा आणि अवहेलना! दलितांनी चर्चच्या कॉयरमध्ये गायचे नाही, पोटभर खायचे नाही, त्यांनी उच्चवर्णीय ख्रिश्चनांपासून वेगळे बसायचे! इतकेच नव्हे तर मेल्यानंतर त्यांच्या मृतदेहांना उच्चवर्णीय ख्रिश्चनांच्या दफनभूमीत पुरायचेही नाही - तात्पर्य, येशू ख्रिस्ताच्या सगळया रॅडिकल शिकवणुकीला चर्चने वाटाण्याच्या अक्षता कशा लावल्या आहेत याचे अनुभवसिद्ध कथन बामाने केले.

ख्रिश्चन चर्चच्या दुटप्पी व्यवहाराची इतकी परखड आणि स्वानुभावावर आधारित टीका पचवणे चर्चला चांगलेच जड गेले. कारण बामाचा आवाज दाबून टाकण्याचे भरपूर प्रयत्न झाले. मात्र न डगमगता नेटाने दलित समाजाच्या आणि विशेषत: दलित स्त्रियांच्या हक्कांसाठीचा आपला लढा चालू ठेवणारी ही लेखिका आहे. मात्र मराठी दलित स्त्रीच्या राजकीय जाणिवेचे आणि संघटनाचे पाठबळ तिच्याशी नाही. तरीही डॉ. आंबेडकरांच्या विचारांच्या आणि लढयाच्या मुशीतून घडलेल्या मराठी दलित स्त्रियांच्या लिखाणातली धर्मचिकित्सेची धग मात्र आपल्याला तिच्या लिखाणात जाणवते. 'सांगाती' आणि 'वन्मम' या तिच्या पुढच्या दोन पुस्तकांमध्ये (या दोन्ही कादंबऱ्या आहेत) बामाने दलित समूहांमध्ये उच्चनीचतेच्या उतरंडीने साधलेल्या दुही-फुटीच्या राजकारणाची, दोन्ही जमातीतील स्त्रियांच्या वाट्याला आलेली पुरूषसत्ताक हिंसाचाराची परखड चिकित्सा केलेली आहे. त्यातून आपल्याला केवळ डॉ. आंबेडकरांचाच नव्हे तर आयोतीदास आणि पेरियार या दाक्षिणात्य विचारवंतांचा प्रभावही दृग्गोचर होतो.

तामिळमध्ये 'Viramma : Life of a Dalit' हे जोसॅन रॅसिन आणि जीन लूक रॅसिन यांनी शब्दबद्ध केलेले वीराम्मा या दलित स्त्रीचे आत्मकथन आपल्याला दलित स्त्रियांच्या आवाजाला अधिकृत परिमाण मिळवून देताना दिसते. दारिद्र्यात पिचणाऱ्या दलित स्त्रियांचे जीवनवस्त्र जन्म, मृत्यू, लैंगिक व्यवहार आणि काबाडकष्ट या धाग्यांनी कसे विणले आहे याचे प्रत्ययकारी पण बरेचसे 'अराजकीय' चित्रण त्यात आहे. आणि खास उल्लेख करायला हवा तो तामिळमध्येच लिहिणाऱ्या शिवकामी या लेखिकेचा. तिची 'पजियाना काजिदालूम' ही कृती या दृष्टीने खूप महत्त्वाची आहे. त्यांनी स्वत:च तिचे इंग्रजी भाषांतर 'The Grip of Change' या नावाने केलेले आहे (2006). तामिळनाडूतील दलित स्त्रियांच्यामध्ये शिक्षणाबद्दल, काम करण्याच्या अधिकारांबद्दल, त्यांना आपल्या जमातीच्या आणि अन्य उच्चवर्णीय समाजाकडून मिळणाऱ्या अन्याय- अत्याचारांबद्दल, जी नवी जाणीव जागृती झालेली आहे; तिचे अस्वस्थ करणारे विवेचन त्यात येते. शिक्षणाने आलेले अस्मितेचे भान पुरेसे आहे काय?

आधुनिकतेच्या नावाखाली आणि वातावरणात लिंगभावाच्या राजकारणामुळे स्त्रियांना शोषणाच्या नवनव्या साच्यांना कसे सामोरे जावे लागते? जातीजातींच्या अस्मितेखाली दलित स्त्रियांची मानसिकता कशी बळी जाते. भरडली जाते? हे प्रश्न विचारणे सोपे नाही. आणि त्यांची उत्तरे देणेही. परंतु हे अवघड आव्हान लेखिकेने पेलले आहे. जात्यांतर्गत लिंगभेदभाव, सामाजिक व्यवहारांमधील अन्याय, स्त्रियांनी समतेसाठी चालवलेले सांस्कृतिक लढे, दलित स्त्रियांचे

साहित्यात स्थान, विवाहसंस्था, दलित स्त्रीमुक्तीवाद, मानवी हक्क आणि अधिकार ही आशयसूत्रे तामिळमध्ये लिहिणाऱ्या दलित स्त्रियांच्या आत्मचरित्रात्मक लेखनात आढळतात.
आता हे सर्व म्हटल्यानंतर आपण लक्षात घ्यायला हवे की आत्मचरित्रांची परंपरा आणि तिचे निकष ठरवताना दलित स्त्रियांनी सामोऱ्या आणलेल्या निवेदनपद्धती, त्यातले ताणेबाणे, आधुनिकतेशी असलेले त्यांचे गुंतागुंतीचे नाते व या साNयांच्या मुळाशी असलेले त्यांचे राजकीय भान त्यांना त्यांचे वेगळेपण बहाल करते, सार्वजनिक विचारव्यूह आणि कुटुंब, धर्म, शिक्षण या आणि इतर अनेक क्षेत्रांमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी त्यांनी वापरलेले निवेदनबंध आपल्याला अन्य स्त्रिया वा पुरूषांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांमध्ये दिसत नाहीत. किंबहुना त्यांची आत्मचरित्रे हा म्हणून इतिहासलेखनाचाच एक प्रकार होय असे म्हटले पाहिजे.

त्यांच्या सत्यदिग्दर्शनातून लढाऊ आणि गौरवशाली इतिहासाची पाने लिहिली जातात. इतिहासाच्या सामूहिक विस्मरणाला त्या आत्मचरित्रांमधून सांगितलेल्या खाजगी वृत्तांतांमधून सामूहिक जागृतीचा उतारा देतात आणि एकाच वेळी 'स्व'भान आणि समूहभान यांचा एकमेळ साधतात. 'व्यक्तीगत' आणि 'खाजगी' अशा बाबी देखील ऐतिहासिक दस्ताऐवज बनतात ते यांमुळेच. त्यांनी वर्णन केलेली जातीव्यवस्था, समूहांचे वर्तनव्यवहार, आयुष्य जगण्याच्या निरनिराळया पद्धती आणि प्रतिकाराच्या उर्जेने त्यात घडवून आणलेले बदल, (उदाहरणार्थ, नागपूर अधिवेशन आणि त्यानंतरची दलित मानसिकता आणि व्यवहार) फुटकळ आणि संधीसाधू राजकारण्यांच्या /पुढाऱ्यांच्या संघटना आणि आंदोलने, त्यातून झालेले ध्रुवीकरण, (मध्यम जातींचे भगवेकरण, आणि नवबौद्ध एकटे पडणे), याबाबतची अस्वस्थता, यांवर या आत्मचरित्रांमधून प्रकाशझोत पडतो. म्हणून त्यांना ऐतिहासिक दस्ताऐवज म्हटले पाहिजे.

'जीवनमार्ग'च्या सौजन्याने

mayapandit@gmail.com

■■■

# माझे मनोगत......

*भालचंद्र काळीकर*

तत्वज्ञान श्रद्धा-अंधश्रद्धा

भारतीय वैदिक तत्त्वज्ञानात सहा प्रमुख दर्शने मानली आहेत. ती अशी :
(१) सांख्य, (२) वैषेशिक, (३) पूर्वमीमांसा, (४) न्याय, (५) योग आणि (६) वेदान्त (उत्तरमीमांसा हा वेदान्ताचाच भाग आहे.)
त्यांपैकी पहिली तीन संपूर्णपणे निरीश्वरवादी असून त्यांचे प्रणेते अनुक्रमे कपिल महामुनी, महर्षी कणाद, आणि आचार्य जेमिनी हे तिघेही महान तत्त्ववेत्ते आणि विचारवंत म्हणून गणले जातात. न्याय आणि योग ह्या दर्शनांचेविषय वेगळे असून "ईश्वर" हा त्यांच्या चर्चेचा विषय नाही. काही अनुषंगाने ईश्वराचा उल्लेख आला असेल तेवढाच. एका परीने न्याय आणि योग ही दोन्ही दर्शने ईश्वराच्या बाबतीत "उदासीन" आहेत.
परंतु सर्वसाधारण जनांमध्ये पहिल्या पाच दर्शनांची चर्चा सहसा होत नाही. बहुतेकांना तर त्या पाच दर्शनांची नावेसुद्धा ठाऊक नसतात. सहाव्या वेदान्त दर्शनाचा मात्र सगळीकडे खूप उदो उदो होतो. ब्रह्म, परब्रह्म, या संकल्पनांची वेदान्त दर्शनात विस्तृत चर्चा असून त्याचाच डांगोरा पिटला जातो. उपनिषदे, भगवद्गीता, ब्रह्मसूत्रे (प्रस्थानत्रयी) हे शब्द

ठाऊक नसलेला वैदिक मताभिमानी शोधूनही सापडणार नाही. ह्याचे प्रमुख कारण आहे प्रापंचिकांची ईश्वरविषयक मान्यता.

"ईश्वर" अथवा "देव" ही संकल्पना अनेक गोटांमधून, अनेक स्तरांवरून, अनेक दृष्टिकोनांतून चर्चिली जाते. जगात असंख्य संप्रदाय आहेत. प्रत्येक संप्रदायाचे लोक आपापल्या चष्म्यातून देवाकडे पाहातात आणि त्यांना जे रूप दिसते तेच खरे मानतात. वेगवेगळे तत्त्वज्ञ, विचारवंत, दार्शनिक, वेगवेगळ्या उपपत्ती मांडून ह्या संकल्पनेला आकळण्याचा प्रयत्न करतात.(त्यापैकी बरेचसे देवाचे असित्व नाकारतातही.) सृष्टीची निर्मिती वा उत्पत्ती, तिचे संचालन वा चरितार्थ हा सर्व विचारवंतांच्या तसेच प्रतिभावंत तत्त्ववेत्यांच्या (ह्यात वैज्ञानिकही आहेत.) नेहमीच कुतूहलाचा आणि संशोधनाचा विषय राहिला आहे. सर्वच जण आपापल्या परीने निष्कर्ष काढून जगापुढे मांडीत असतात.

जैविक उत्क्रांतीसाठी पायाभूत असलेल्या , "आहार-निद्रा-भय-मैथुनं च।" ह्या नैसर्गिक चौकटीत वावरणाऱ्या सर्वसामान्य मानवाला--जो समाजाचा सर्वात मोठा घटक आहे, किंबहुना तोच खरा समाज आहे-- त्याला ह्या तात्त्विक चर्चेशी काहीही देणे-घेणे नसते. प्रपंचाच्या रामरगाड्यात त्याला विचार करायला तेवढा वेळही नसतो. प्रपंचातील अस्थिरता आणि अनिश्चितता ह्यांना तोंड देता देता मेटाकुटीस आलेला सामान्य माणूस ह्या मूठभर द्रष्ट्या तत्त्वज्ञांना दुरूनच नमस्कार करतो. त्याचा जवळून नमस्कार घडतो तो त्याला कळणाऱ्या "देवाला." आणि हा देव आहे "उपासनेचा" देव. त्याचा भाबड्या समजुतीप्रमाणे हा देव त्याची प्रार्थना ऐकतो. पूजा-अर्चा, व्रत-वैकल्ये, अभिषेक-अनुष्ठान, आदींनी प्रसन्न होतो. जप-तप, उपास-तापास इत्यादींनी संतुष्ट होतो. नवसाला पावतो. पापविमोचन करतो. थोडक्यात म्हणजे सर्व प्रकारचे चमत्कार घडवितो. भक्ताच्या प्रापंचिक अडचणी दूर करतो. संकटप्रसंगी पाठीशी उभा राहतो.संतती-संपत्तीचे रक्षण करतो. सामान्य प्रापंचिकास अशा-काल्पनिक का होईना-देवाचा मोठा आधार वाटतो. त्याच्या दृष्टीने असा देव खराच असतो.

वास्तविक जगातील सर्व व्यवहार निसर्गनियमांनुसार घडत असतात. प्रत्येक घटितामागे कुठला ना कुठला तरी निसर्ग नियम असतोच. ह्या नियमांचे उल्लंघन कुणीच करू शकत नाही. पण प्रापंचिकाची अशी एक मानसिकता बनलेली आहे. नित्याच्या व्यवहारात वेगवेगळया कामांच्या निमित्ताने वेगवेगळ्या प्राशासनिक कार्यालयांमध्ये जाण्याचे प्रसंग येतात. प्रत्येक प्रशासनाचे ठरलेले नियम असतात. त्यांचे उल्लंघन न होणे अपेक्षित असते. परंतु तरीही उल्लंघने होत असतात. प्राशासनिक नियम बाजूल सारून, रांग मोडून (आऊट ऑफ वे जाऊन ) व त्यासाठी काही मोबदला घेऊन अडलेली कामे करून देणारे "कुणीतरी" असते. प्रापंचिकांना ह्याची सवय झालेली असते. हीच ती बनलेली मानसिकता.

मानवी राज्याप्रमाणे निसर्गाच्या राज्यातही नियमांमध्ये अशी ढवळाढवळ करणारे, Out of the way जाऊन कामे करून देणारे "कुणीतरी" आहे असे ते गृहीत धरतात. हे कुणीतरी म्हणजे अर्थातच कल्पनेच्या विश्वातील देव. कसल्यातरी मोबदल्यात तोही आपल्या सांसारिक अडचणी दूर करील , सर्व इच्छा ,सर्व मन:कामना पूर्ण करील अशी त्यांची ठाम धारणा असते. पूर्वापार "चालत" आलेल्या परंपरा, चालीरीती रूढी, संस्कार ह्यांमुळे ही धारणा अधिकाधिक दृढ होत जाते. आणि पुढे तर अढळ होऊन बसते.

सर्वसामान्य प्रापंचिक हा एक प्रकारच्या वैचारिक आळसामुळे चिकित्सक वृत्तीला पारखा झालेला असतो. तर्कबुद्धीशी त्याचा संबंध आलेला नसतो. त्यामुळे तो परंपरेने चालत आलेल्या गोष्टी तशाच, म्हणजे विचार न करता चालू ठेवतो. कल्पनेने गृहीत धरलेल्या देवाला "हाताशी " ठेवण्यासाठी पूजा-अर्चा, जपतप, उपास-तापास, इत्यादि नित्य, तर अडीअडचणीच्या वेळी हाक मारण्यासाठी व्रत-वैकल्ये , अभिषेक-अनुष्ठाने, ग्रहशांती, वास्तुशांती, नवस-सायास, इत्यादि नैमित्तिक कर्मकांडे करीत असतो. हे सर्व असेच चालत असते हे त्याच्या मनात ठसलेलेच असते. उलट कुणी शंका घेतली तर त्याचा त्याला विस्मय वाटतो.

पण त्यांच्यातील काही विचारवंतांना मात्र कुठेतरी "खटकते." परंपरेने चालत आलेले हे सर्व सोडण्याचे धैर्य त्यांच्या ठिकाणी नसले तरी त्यांच्या मनात खोल कुठेतरी एक सल असते.आपण आपल्या सहायकर्त्या देवाला वेठीस धरीत

आहोत, त्याला कार्यालयातील एका बाबूच्या पातळीवर आणून त्याचे अवमूल्यन करीत आहोत, त्याच्याबरोबर विनिमय करीत आहोत अशी अपराधाची भावना खात असते. एक खंत मनात घर करून असते. असे लोक मग आपल्या ईश्वराला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी वेदान्ताचा आधार घेतात. त्यांचा देव आता विश्वनिर्माता, जगच्चालक, चराचर व्यापणारा, विश्वंभर होतो. वेडा कुंभार, अदृश्य विणकर, इत्यादि लडिवाळ विशेषणांनी त्याला गौरविले जाते. मानवी भावविश्वात कुठे काही "उत्तम, उदात्त, उन्नत" आढळले की ते "दैवी" ठरविले जाते. "मातृदेवो भव।, पितृदेवो भव।, देश हा देव असे माझा।, " अशी भावस्पर्शी विधाने रूढ होतात. तर कांही प्रतिभावंत तत्त्ववेत्ते ह्या ईश्वराला आणखी उच्चस्तरावर नेऊन ब्रह्म, परब्रह्म, निर्गुण, निराकार, पूर्णब्रह्म, चित् शक्ती, इत्यादि शब्दांच्या फुलोऱ्याने सजविलेल्या मखरात प्रतिष्ठित करतात. वेदान्तदर्शनामधील श्लोकांचे सोयीप्रमाणे अर्थ लावून लोकांपुढे मांडतात. कीर्तन-प्रवचनांतून शब्दांचा गदारोळ उठवितात. सामान्य माणसाला यातले काही कळत नसते. त्याच्यासमोर उलगडलेल्या सर्वच अर्थांना  तो आपला भाबडेपणाने मान डोलावतो. बुद्धिमान आणि प्रतिभावंत तत्त्ववेत्ते मग अशाप्रकारे परमेश्वराच्या ऋणातून मुक्त झाल्याच्या, अपराध पुसून टाकल्याच्या भावनेने कृतकृत्य होत्साते फिरून मूळपदावर येऊन ,"केशवाय नम:। माधवाय नम:।" करायला मोकळे होतात. सामान्य प्रापंचिक तर या शब्द सरितेत न्हाऊनही कोरडेच राहातात. असे हे वेदान्तदर्शनाचे माहात्म्य!

bhalchandra.kalikar@gmail.com,

■■■

# 'मानव विकास अहवाला'त भारत

*देवेन्द्र इंगळे*

विकास अर्थकारण शिक्षण आरोग्य

गाझा पट्टीत होत असलेल्या मानवी हक्क हननाविरुद्ध 'युनायटेड नेशन्स ह्युमन राइट्स काऊन्सिल' ने मांडलेल्या ठरावाच्या बाजूने भारताने ज्या दिवशी मतदान केले त्याच्या आदल्याच दिवशी, म्हणजे २३ जुलै २०१४ रोजी 'जागतिक मानव विकास अहवाल- २०१४' प्रसिद्ध झाला. दर वर्षी प्रसिद्ध होणारा हा 'मानव विकास अहवाल' म्हणजे जगातील प्रत्येक देशासाठी स्वत:ला आरशात न्याहाळून घेण्याची एक संधी असते. देशाची स्थिती-गती काय आहे ते समजून घेता येणे शक्य होते. देशहिताच्या दृष्टीने अग्रक्रमाने कोणती पावले उचलायला हवीत हेही कळते. मागच्या दोन दशकांत मानव विकासाच्या आघाडीवर भारताची जी वाटचाल सुरू आहे ती कितपत समाधानकारक आहे? मानव विकासविषयक नियोजन आणि परिणामकारक अंमलबजावणी संदर्भात आपण पुरेसे गंभीर आहोत का? गाझा पट्टीत होणाऱ्या मानवी हक्क उल्लंघनाविषयी आपण संवेदनशील असायलाच हवे; पण आपण ज्या हिरिरीने आंतरराष्ट्रीय राजकारणात मानवी हक्कांच्या बाजूने उभे असतो तितक्याच संवेदनशीलतेने आपण आपल्याच देशातील मानवी हक्क आणि मानव विकासाच्या समस्येविषयी विचार करतो का?

या वर्षीचा (२०१४) मानव विकास अहवाल म्हणजे २०१३ या वर्षात करण्यात आलेल्या व्यापक सर्वेक्षण आणि अभ्यासांच्या आधारे जागतिक मानव विकासाचा लेखाजोखा. आरोग्यदायी दीर्घायुर्मान, शैक्षणिक विकासस्तर आणि राहणीमानाचा दर्जा या प्रमुख तीन निकषांच्या आधारे प्रत्येक देशाचा मानव विकास निर्देशांक निश्चित करण्यात आला असून त्याआधारे १८७ देशांची क्रमवारी निश्चित करण्यात आली आहे. या क्रमवारीत नॉर्वे हा देश ०.९४४ निर्देशांकासह सर्वोच्च स्थानी असून ०.३३७ निर्देशांकासह  नायजर हा देश सर्वात तळाशी आहे.

शाश्वत विकासाचे ध्येय प्राप्त करता यावे म्हणून जगातील हर तऱ्हेची असुरक्षिता कमी करणे सुरक्षित जगाची उभारणी करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून या वर्षीचा मानव विकास अहवाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. मानव विकास निर्देशांकाच्या आघाडीवर त्या त्या देशांनी साध्य केलेल्या प्रगतीनुसार १८७ देशांची विभागणी, (१) अतिउच्च मानव विकास, (२) उच्च मानव विकास, (३) मध्यम मानव विकास आणि (४) निम्न मानव विकास अशा चार भागांत करण्यात आली आहे. भारत 'मध्यम' प्रतीचा मानव विकास साध्य करणाऱ्या देशांच्या यादीत समाविष्ट आहे. जागतिक क्रमवारीत भारत ०.५८६ निर्देशांकासह १३५व्या स्थानी अर्थात तळाकडून ५२व्या क्रमांकावर आहे. भारताच्या प्रमुख शेजारी देशांपकी श्रीलंकेने ०.७५० निर्देशांकासह ७३ वे स्थान आणि चीनने ०.७१९ निर्देशांकासह ९१वे स्थान प्राप्त केले आहे. ०.५५८ निर्देशांकासह बांगलादेश १४२ व्या स्थानावर आहे. नेपाळ ०.५४० निर्देशांकासह १४५व्या स्थानावर, तर पाकिस्तान ०.५३७ निर्देशांकासह १४६व्या स्थानी आहे. मानव विकास निर्देशांकाच्या कसोटीवर निकाराग्वुआ (स्थानक्रम-१३२, मा.वि.नि.- ०.६१४), किरिबाती आणि ताजकिस्तान (दोघांचे स्थानक्रम- १३३, मा.वि.नि.- ०.६०७), भूतान आणि कंबोडिया (दोघांचे स्थानक्रम- १३६, मा.वि.नि.- ०.५८४), घाना (स्थानक्रम-१३८, मा.वि.नि.- ०.५७३), लाओस (स्थानक्रम- १३९, मा.वि.नि.- ०.५६९), काँगो (स्थानक्रम- १४०, मा.वि.नि.- ०.५६४), झांबिया (स्थानक्रम- १४१, मा.वि.नि.- ०.५६१) या देशांसोबत भारताची स्पर्धा आहे.

आपण पुरेशा गांभीर्याने कधी तरी हे वास्तव समजून घ्यायलाच हवे की, जगाचा सरासरी मानव विकास निर्देशांक (०.७०२) आहे, त्यापेक्षा भारताचा निर्देशांक (०.५८६) लक्षणीय प्रमाणात खालावलेला असून तो दक्षिण आशियाई प्रदेशाच्या सरासरी (०.५८८) निर्देशांकापेक्षाही खालावलेला आहे.

मानव विकास निर्देशांकाच्या कसोटीवर मागच्या तीन दशकांत भारताचा सरासरी वार्षिक वृद्धीदर कमालीचा निराशाजनक असून भारताची वाटचाल अतिशय संथ आहे. १९८०-१९९०च्या दशकात सरासरी वृद्धीदर १.५८; १९९० ते २०००च्या दशकात सरासरी वृद्धीदर १.१५, तर २००० ते २०१३ दरम्यानचा वृद्धीदर १.४९ इतका आहे. यामुळे मानव विकासाच्या बाबतीत भारताची तुलना फक्त सब-सहारन आफ्रिकेतील अतिमागास देशांसोबतच होऊ शकते. २०१४च्या जागतिक मानव विकास अहवालात, मानव विकास निर्देशांकाच्या कसोटीवर जे देश 'मध्यम' किंवा 'निम्नतम' पातळीवर आहेत त्यांच्या संथ वाटचालीविषयी गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. या अहवालात विविध प्रकारे असुरक्षिततेने ग्रासलेल्या आघातग्रस्त (व्हल्नरेबल) मानवसमूहांच्या जागतिक समस्येवर विशेष प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. असे मानवसमूह जे कुठल्याही नैसर्गिक वा मानवनिर्मित आपत्तीच्या प्रसंगी अथवा जीवनविकास क्रमातील प्रतिकूलमुळे वा संस्थात्मक स्वरूपाच्या असुरक्षिततेमुळे 'सहजभक्ष्य' बनतात त्यांना मानव विकास अहवालाने असुरक्षित आघातग्रस्त (व्हल्नरेबल) मानले आहे. अशा असुरक्षित आघातग्रस्त मानवसमूहांचे अस्तित्व हे एखाद्या देशाचा मानव विकास लक्षणीयरीत्या कुंठित होण्यास कारणीभूत ठरते.

सततच्या नैसर्गिक आपत्तींनी ग्रासलेल्या भूप्रदेशांबरोबरच प्रामुख्याने दक्षिण आशियाई देश व सब-सहारन आफ्रिकेतील देश व सतत युद्धरत असलेल्या भूप्रदेशांत असुरक्षित आघातग्रस्त मानवसमूह अधिक मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहेत. भारतही तशाच देशांपकी एक आहे जिथे असुरक्षित आघातग्रस्त (व्हल्नरेबल) मानवसमूह चिंता वाटावी इतक्या मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहेत.

जागतिक मानव विकास अहवालाच्या म्हणण्यानुसार कमालीच्या अधम व असुरक्षित स्थितीत जीवन कंठणाऱ्या मानवसमूहांना जोवर सर्वार्थाने सुरक्षितता लाभत नाही तोवर जिथे शाश्वत व सातत्यपूर्ण सुरक्षित मानवी जीवनाची हमी असेल असे जग निर्माण होऊ शकत नाही. म्हणूनच असुरक्षित आघातग्रस्त मानवसमूहांचे आधिक्य असलेल्या भूप्रदेशांतील मानव विकास निर्देशांकात सुधार होण्याच्या दृष्टीने तातडीने पावले उचलण्याविषयी आग्रही मत अहवालात नमूद करण्यात आले आहे.

भारतासंदर्भात बोलायचे तर, सामाजिक-आíथक पातळीवरची विषमता व मागासलेपणाचे आघात ज्यांना कधीही सहन करावे लागत नाहीत अशाच उच्च वर्गजातीय अभिजनांच्या हाती आजवर भारताची सत्तासूत्रे राहिली आहेत.

जमीनदार, सामंत, बनिया, भांडवलदार, नोकरशहांचा मिळून बनलेल्या उच्च जातवर्गीय शासनकर्त्यांनी सामाजिक-आर्थिक विषमतेतून जन्मास आलेल्या धगधगत्या वास्तवाकडे नेहमीच सोयिस्कर दुर्लक्ष करण्याचे धोरण अंगिकारले. कधी 'गरिबी हटाव'ची घोषणा करून, कधी 'आम आदमी का साथ' निभावण्याची खोटी द्वाही मिरवून, कधी 'महासत्ता' बनण्याची फुशारकी मारून तर कधी 'अच्छे दिन येणार' असल्याची दिवास्वप्ने विकून सत्ताधारी वर्गजाती बेदरकारपणे सत्तेचा उपभोग घेत राहतात.

ingledevs@gmail.com,

■■■

# सुसह्य नागरीकरणासाठी हवा संतुलित विकास

*अभय टिळक*

विकास अर्थकारण समाजकारण

"शहरीकरणाच्या प्रक्रियेत अग्रेसर असलेले राज्य', असा महाराष्ट्राचा लौकिक पार त्याच्या स्थापनेपासूनचा आहे. आर्थिक विकास, औद्योगीकरण आणि शहरीकरण यांचे जैविक नाते ध्यानात घेता, या वास्तवाचा विस्मय वाटत नाही. औद्योगिकदृष्ट्या पुढारलेले राज्य, अशीच महाराष्ट्राची ओळख आहे. वस्तुनिर्माण उद्योग (मॅन्युफॅक्चरिंग) आणि सेवा उद्योग (सर्व्हिसेस) या दोन बिगरशेती क्षेत्रांचा राज्याच्या ठोकळ उत्पादितामधील एकत्रित वाटा आज जवळपास 89 टक्क्यांच्या घरात आहे. तर, 2011 सालच्या जनगणनेची जी प्राथमिक आकडेवारी हाती येते, तिच्यानुसार नागरीकरणाची राज्यातील सरासरी पातळी 45.23 टक्के इतकी आहे. नागरीकरणाच्या देशपातळीवरील 31 टक्क्यांच्या सरासरीपेक्षा महाराष्ट्रातील नागरीकरणाची सरासरी पातळी किती तरी अधिक आहे. सर्वसाधारण आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत बिगरशेती व्यवसाय क्षेत्रांची आगेकूच होते आणि त्यातूनच शहरांच्या वाढविस्ताराला गती येते. त्यामुळे, औद्योगिकदृष्ट्या देशभरात आघाडीवर असलेला महाराष्ट्र नागरीकरणाच्या विस्तारातही बिनीवर राहावा, हे स्वाभाविकच ठरते.

त्यामुळे राज्यातील शहरी वाढविस्ताराचे नियोजन - व्यवस्थापन काटेकोरपणे करणे, हेच येत्या काळातील एक बिकट आव्हान ठरावे. कारण, इथून पुढच्या काळात आर्थिक विकासाचे राज्यासमोरील आव्हान दुहेरी बनणार आहे. शेतीसह एकंदरीनेच कुंठित बनलेल्या ग्रामीण अर्थकारणास एकीकडे चालना देत असतानाच, दुसरीकडे बकालपणे हातपाय पसरणाऱ्या शहरी विस्तारास शिस्त लावणे, असे हे दुहेरी आव्हान येत्या काळात सर्वांचीच कसोटी पाहणारे ठरेल. ग्रामीण विकास आणि शहरीकरण यांच्यादरम्यान जे एक नैसर्गिक, जैविक आणि परस्परपोषक नाते अपेक्षित असते, त्या नात्याची पार वासलात लागल्याचे चित्र राज्यात दिसते. परिणामी, राज्याच्या ग्रामीण भागांतून शहरांकडे स्थलांतर करणाऱ्या गोरगरिबांबरोबरच गरिबीचेही स्थलांतर राज्यात घडून येताना दिसते. शहरी दारिद्र्याचे राज्यातील प्रमाण आणि शहरोशहरी पसरणाऱ्या झोपडपट्ट्या याच वास्तवाची साक्ष देतात.

राज्यातील नागरीकरणाच्या प्रक्रियेत गेल्या 50 वर्षांत जो असमतोल पोसला गेलेला आहे, त्या असमतोलामध्ये राज्यातील विषम आणि निकृष्ट शहरी वाढविस्ताराची बीजे रुजलेली आहेत. नागरीकरणाच्या विस्तारातील हे असंतुलन विभाग, जिल्हा आणि शहर अशा तीनही पातळ्यांवर सुखेनैव नांदत आहे. आता, यातही पुन्हा विस्मय वाटण्याजोगे काहीच नाही. नागरीकरणाचा विस्तार हे सर्वसाधारण आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचे अपत्य गणले जाते. त्यामुळे "जे आडात तेच पोहोऱ्यात" या नात्याने राज्यातील आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील साऱ्या गुणदोषांचे प्रतिबिंब राज्यातील नागरीकरणाच्या वाढविकासात डोकवावे, हे ओघानेच येते. मुळात, आपल्या राज्यातील आर्थिक

विकासाच्या प्रक्रियेत प्रचंड विभागीय असमतोल आहे. हाच प्रादेशिक असमतोल शहरीकरणाच्या विस्तारातही झिरपलेला दिसतो.

या सगळ्यातील मोठा विरोधाभास म्हणजे, विकेंद्रित औद्योगिक विकासाचे धोरण राज्यात 1970 आणि 1980 च्या दशकात राबविले जाऊनही त्याद्वारा राज्यात विकेंद्रित नागरीकरणाला चालना मिळाल्याचे दिसत नाही. राज्यातील नागरीकरणाच्या "पॅटर्न' वर मुंबईच्या भौगोलिक स्थानांकनाचा आणि मुंबईच्या गेल्या चार शतकी भरभराटीचा प्रचंड पगडा आहे. राज्यातील सहा महसुली विभागांमध्ये कोकण विभागाची नागरीकरणाची सरासरी पातळी सर्वोच्च आणि राज्य सरासरीपेक्षा किती तरी अधिक आहे. 1961 सालच्या जनगणनेनुसार, राज्यातील नागरीकरणाची सरासरी पातळी 28 टक्क्यांच्या आसपास होती, तर त्याच आकडेवारीनुसार, कोकण विभागातील नागरीकरणाची सरासरी पातळी होती 56 टक्क्यांहून अधिक. 2011 सालच्या जनगणनेची तपशीलवार आकडेवारी अद्याप प्रकाशित झालेली नाही; परंतु, 2001 मध्येही तौलनिक चित्र असेच होते. 2001 सालच्या जनगणना आकडेवारीनुसार राज्यातील नागरीकरणाचे सरासरी प्रमाण 42 टक्क्यांवर पोचलेले होते, त्या वेळी कोकण विभागातील नागरीकरणाच्या सरासरी पातळीने 75 टक्क्यांचा टप्पा पार केलेला होता.

**खुपणारा विभागीय असमतोल**

कोकण विभागाखालोखाल या क्रमवारीत मग येतात पुणे, नागपूर आणि नाशिक महसुली विभाग. राज्यातील आर्थिक विकास मुंबई-पुणे-नाशिक या त्रिकोणातच बव्हंशी एकवटलेला असल्याने, राज्यातील शहरीकरणही याच त्रिकोणात एकवटलेले आहे. राज्यातील एकंदर शहरी लोकसंख्येपैकी 74 टक्के शहरी लोकसंख्या कोकण, पुणे आणि नाशिक या तीन महसुली विभागांत केंद्रीभूत झाल्याचे 1961 ची जनगणना सांगते. हीच टक्केवारी 75 टक्क्यांवर पोचल्याचे चित्र 2001ची आकडेवारी आपल्यासमोर मांडते.

शहरी लोकसंख्येचे आकारमान वाढणे आणि लहान-मोठ्या आकाराच्या नागरी केंद्रांच्या संख्येमध्येही भर पडणे, या दोन्ही गोष्टी नागरीकरणाच्या वाढविस्तारादरम्यान समांतर पद्धतीने घडून येणे अपेक्षित आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत इथेही विसंवादच दिसतो. 1961 सालच्या जनगणनेनुसार, त्या वेळी 1 कोटी 12 लाखांच्या घरात असलेली महाराष्ट्राची शहरी लोकसंख्या लहानमोठ्या आकारमानाच्या एकंदर 268 नागरी केंद्रांमध्ये विभागलेली होती. आता, 2011 सालच्या प्राथमिक आकडेवारीनुसार महाराष्ट्रातील 5 कोटी 8 लाख इतकी शहरी लोकसंख्या 535 नागरी विभागांत सामावलेली आहे. म्हणजेच, 1961 आणि 2011 या पाच दशकांच्या कालावधीदरम्यान राज्यातील शहरी लोकसंख्येमध्ये साधारणपणे साडेचारपट वाढ घडून आली; परंतु नागरी केंद्रांची संख्या मात्र वाढली केवळ दुपटीनेच. त्यातही पुन्हा, नागरी केंद्रांच्या संख्येतील बहुतांश वाढ 2001 आणि 2011 या दशकभरादरम्यानच घडून आलेली दिसते. याचा मथितार्थ हाच, की महाराष्ट्रातील नागरीकरणाची आगेकूच ही पूर्वापार अस्तित्वात असलेल्या नागरी केंद्राच्या लोकसंख्येमध्ये भर पडण्यातूनच चालू आहे.

त्यातही पुन्हा कहर म्हणजे, राज्यातील सर्व लहान-मोठी शहरे सर्वसाधारणपणे समान गतीने वाढताना दिसत नाहीत. एक लाख वा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या शहरांमध्ये राज्यातील एकंदर शहरी लोकसंख्येपैकी 66 टक्के शहरी लोकसंख्या एकवटलेली होती, असे 1961 ची जनगणना सांख्यिकी आपल्याला सांगते. 2001 सालच्या जनगणनेनुसार, एक लाख अथवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या शहरांमधील हे केंद्रीकरण 80 टक्क्यांपर्यंत उंचावलेले दिसते. मुंबई-पुण्यासारख्या मोठ्या शहरांमधील स्थानिक स्वराज्य संस्था त्या त्या शहराचे व्यवस्थापन करताना आज मेटाकुटीला आल्याचे का दिसतात, त्याचे उत्तर राज्यातील शहरांच्या अशा असमान वाढीत सापडते.

महाराष्ट्रातील या अशा विषम नागरीकरणाची नाळ फसलेले औद्योगिक विकेंद्रीकरण आणि खुरटलेली शेती या दुहेरी वास्तवाशी जुळलेली आहे. राज्यातील औरंगाबाद आणि अमरावती हे दोन महसूली विभाग नागरीकरणाच्या विकास विस्तारात पूर्वापारच मागे रखडलेले दिसतात. या दोन महसुली विभागांत मिळून 13 जिल्हे आहेत. हे जिल्हे बहुशः शेतीप्रधानच आहेत. शेतीसह एकंदरच प्राथमिक क्षेत्रामध्ये रोजीरोटी कमावणाऱ्या श्रमिकांचे या 13 जिल्ह्यांतील

एकंदर श्रमिकांमध्ये असणारे प्रमाण आजही प्रत्येकी 70 टक्क्यांहून अधिकच आहे. या 13 जिल्ह्यांमधील शेती मुख्यतः पावसावरच विसंबलेली आहे. सगळ्यात कळीची बाब म्हणजे, या 13 जिल्ह्यांमधील अंतिम सिंचन क्षमताही 12 ते 17 टक्क्यांच्या दरम्यानच आहे. ज्या भागातील शेती मुख्यतः पावसावरच निर्भर आहे, जिथे बिगरशेती उद्योगव्यवसायांचा मर्यादित विस्तार आहे, तेथील सर्वसाधारण आर्थिक विकास कमजोर राहणारच. आर्थिक विकासच क्षीण असेल तर नागरीकरणही कुपोषितच असणार.

राज्यातील असमान नागरी वाढविकासाचा प्रश्न हा मूलतः विषम प्रादेशिक विकासाचा प्रश्न आहे. विकेंद्रित औद्योगीकरणाद्वारा विकेंद्रित नागरीकरणास चालना मिळत नाही, हा धडा आपण शिकलेलो आहोत. शेतीची दुरवस्था असल्याने विकेंद्रित नागरीकरणाला शेती क्षेत्राकडून ऑक्सिजनचा पुरवठा होण्याच्या शक्यता मंद आहेत. राज्यातील कुंठित सिंचन क्षमतेमुळे शेतीची उत्पादकता खुरटलेली आहे. या सगळ्या समस्या परस्परांत घट्टपणे गुंफलेल्या आहेत. हा गुंता उकलायचा तर गरज आहे ती प्रगल्भ राजकीय इच्छाशक्तीची आणि बहुआयामी प्रयत्नांची. त्या प्रयत्नांना पाठबळ हवे ते एकात्मिक चिंतनाचे. आज अभाव आहे तो नेमका त्याचाच!

'लोकसत्ता'च्या सौजन्याने

ispe@vsnl.net,

■■■

# *अनश्व रथ, पुष्पक विमान* या लेखमालिकेवरील चर्चासत्र

*अनुराधा मोहनी*

*(रवींद्र रुक्मीणी पंढरीनाथ यांच्या आजचा सुधारक च्या सप्टेंबर, ऑक्टोबर व नोव्हेंबर 2015 च्या अंकात* अनश्व रथ, पुष्पक विमान *ही लेखमालिका प्रकाशित झाली होती. त्या लेखमालिकेवरील चर्चासत्राचा हा वृत्तांत आहे. हे चर्चासत्र मुंबई सर्वोदय मंडळ, शांताश्रम, ताडदेव, मुंबई येथे दि. ७.१२.१४ रोजी आयोजित केली होती. व डॅनियल माजगावकर, सुनीती सु. र. व सुरेश सावंत या चर्चासत्राचे निमंत्रक होते. चर्चेचे शब्दांकन अनुराधा मोहनी यांनी केले आहे. – का. सं)*

**सुनीती**: ही चर्चा केवळ वेळेवर नाही तर आशयावर अवलंबून आहे. हिंदुत्वाचे आह्वान व पुरोगाम्यांचे विखुरलेपण समजून घेत आपल्याला भूमिका निश्चित करण्यापर्यंत जाता येईल. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी ही चर्चा होईल. आपण अनेक ठिकाणी एकत्र येतो आहे, पण सम्यक संवाद आवश्यक. आज चर्चेसाठी पुरोगामी चळवळीतील वेगवेगळ्या प्रवाहातील मित्र आलेत ही चांगली गोष्ट आहे. आरोप प्रत्यारोप न करता गाठी सोडवण्यासाठी संवाद होईल अशी आमची अपेक्षा आहे. स्वाभाविक चर्चा होऊ द्यावी. रवींद्रने लेखातील भूमिका थोडक्यात सांगावी. त्याशिवाय त्याला इतरही काही सांगायचे असल्यास तेही मांडावे.

**रवीन्द्र**: आपण सर्वांनी लेख वाचलेलेच आहेत. ह्या संदर्भात शांताश्रमात झाडलेल्या अशाच एका चर्चासत्राची आठवण सांगावीशी वाटते. 'मी नथुराम गोडसे बोलतोय' हे नाटक नुकतेच रंगमंचावर आले होते. त्यावर ही चर्चा होती. पुरोगामी मंडळी खूप अस्वस्थ झाली होती. आपण नाटकावर बंदी आणण्याची मागणी करणार नाही, उलट अशा बंदीचा निषेध करू ह्यावर त्यांचे एकमत होते. पण ह्याचे उत्तर कसे द्यायचे ह्याविषयीच्या त्यांच्या मांडणीत विस्कळीतपणा होता. चर्चेत व्यवस्थित बाजू मांडणारा माणूस ग्राहक संघाचा, पर्यायाने रा. स्व. संघाचा होता. त्याला

ह्या चर्चेत निमंत्रित करण्याचा भाबडेपणाही आपलाच. पण संघाचा माणूस मात्र उत्तमपणे मखलाशी करीत होता. त्यानंतर आजतागायत नथुरामचे प्रयोग सुरू आहेत, पण गांधीजींची बाजू व्यावसायिक नाटकांत, प्रायोगिक नाटकांत वा अन्य कोणत्याही माध्यमाद्वारे मांडलेली नाही.

इ.स. १९९२ च्या दंगलींनंतर आपण एकत्र आलोत. म्हणजे आपण फक्त प्रतिक्रिया देण्यासाठी जमतो, गेल्या चाळीस वर्षांत आपण स्वतःहून कृती केली नाही. म्हणून आज आपण एकत्र आलोत ही चांगली गोष्ट. मी लेखांमध्ये पुरोगाम्यांविषयी तिखटपणे मांडलेले आहे. प्रामाणिकपणे आत्मपरीक्षण व आत्मटीका करण्याची आपल्याला सवय नाही. आज आपण ह्या लेखांवर खोलात जाऊन बोलू या. मतभेद असल्यास ते मांडू या. 'पुढे काय करायचे ते बोला' ह्याची घाई करू नये. कोणत्या गोष्टी पटतात, कोणत्या नाही हे समजून घेऊ या. उदा – गांधीनी ओबीसीसाठी काय केले ह्याची कदर ओबीसींनी केली नाही असे म्हटले आहे. त्याचा विस्तार केला नाही. कोणाला त्याविषयी शंका असेल तर आपण आधी गांधी व ओबीसी ह्याचे नाते स्पष्ट करू. त्यासाठी आपण स्वतःला गांधीवादी म्हणवण्याची, किंवा देवधर्म मानण्याची गरज नाही. आपापल्या मांडणीसह आपल्याला एकत्र येता येईल. दाभोलकरांच्या खुनानंतर दोन्ही अंधश्रद्धा निर्मूलनाच्या दोन्ही संघटनांनी एकत्र येऊन कायद्याबद्दल काम करावे, म्हणजे तो मार्गी लागेल असे मी सुचवले होते, पण तेही स्वीकारले गेले नाही. आपण लोकशाहीवादी असल्यामुळे ताकद वाढत नाही, हे खरे आहे काय? आपली लोकशाहीनिष्ठा आपण आचरणातून सिद्ध केली पाहिजे. आजच्या चर्चेत मागच्या निवडणुकीचे राजकीय विश्लेषण फार करू नये. मोदी व संघ ह्यांचे आपसात जमणार नाही, किंवा संघाच्या शाखांमध्ये आजकाल फारशी माणसे येत नाहीत या बाबींवर संतोष न मानता आपण काय करायचे ह्यावर भर द्यावा.

पुरोगाम्यांनी काय चुका केल्या हा पहिला मुद्दा. परंपरा म्हणजे काय, परंपरेतही परिवर्तन असते व परिवर्तनाचीही परंपरा असते ह्या बाबी त्यांनी समजून घेतल्या नाहीत. आपणच पहिले व शेवटचे क्रांतिकारक आहोत अशी आपली समजूत आहे. आपण फक्त फुले आंबेडकरांचे नाव घेतो, पण आपला त्यांचा अभ्यास नाही. तुकाराम, कबीर, बुद्ध वगैरेंचेही तेच. अनश्व रथ व पुष्पक विमान ह्या बाबी आपण हास्यास्पद मानतो, पण आज बहुसंख्य लोक तसे मानत नाहीत. त्यांच्या गळी ते उतरविण्यात आले आहे. आपण परंपरा मानताना मूल्यविवेक जागा ठेवला तर प्रश्न येणार नाही. पण आपण सर्व युरोसेंट्रिक परंपरांचे गुलाम आहोत. आयुर्वेद, योग, शास्त्रीय संगीत. नृत्य, लोककला ह्या चांगल्या परंपराही आपण नाकारल्या, ह्याउलट संघाने सर्व परंपरांचे उदात्तीकरण केले. त्याच वेळी परंपरेतील शंबुकवध, प्रल्हाद, सीतात्याग इत्यादी गोष्टीवर त्यांनी मौन बाळगले. त्यामुळे रास्वसंघ म्हणजे परंपरेचे समर्थक व आपण म्हणजे तिचे विरोधक असे चित्र उभे राहिले. जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये आता अस्मितेचे प्रश्न महत्त्वाचे ठरत आहेत. स्वतःची ओळख सांगताना परंपरेविषयी अभिमान जागृत होत आहे. ह्या पार्श्वभूमीवर सगळीच परंपरा नाकारणारे आपण सर्वसामान्य लोकांकडून दूर लोटले जातो. सर्वोदयातही गांधीविचाराशी प्रतारणा करणारी माणसे शिरली. पण त्याला विरोध आपण केला नाही. एकमेकांचे वाभाडे काढण्याचे काम मात्र करत राहिलो, हे चुकले. आताही हे मानले तर शिकून पुढे जाता येईल.

**संघाची कार्यपद्धती** पाण्याचा थेंब टपटपत असताना खडकालाही भेग पडते. त्याचप्रमाणे एकच विचार वारंवार सांगत राहिला तर तो लोकांच्या गळी उतरतो. यासाठी संघाने अनेक लोकांना कार्यक्रम दिला. उदा. फोटोफ्रेम मागे हे हिंदुराष्ट्र आहे हे चिकटवणाऱ्याची गोष्ट. जो माणूस जेथे आहे, तेथून काय करता येईल ते सांगणारा संघ. आपण क्रांतीच्या गप्पा करताना मध्यमवर्गाला बाजूला टाकले ही चूक होती. प्रत्येकाला शोधून कार्यक्रम देणारा संघ, आपण त्यात कमी पडलो. दगडावर संततधार धरली तर त्याला भेग पडलीच पाहिजे. पन्नास वर्षे संघ राजकारणामध्ये दुर्लक्षित राहिला, पण सातत्याने काम करीत राहिल्यामुळे आता त्यांना त्याचे फळ मिळाले आहे.

**दीक्षाभूमीवरचा अनुभव** दलितांचे खरे शत्रू गांधीच हा प्रचार सुरू आहे. बुद्धमूर्तीचा तालिबानने केलेला विध्वंस. हे पूर्ण पुस्तक संघीय विचारांच्या माणसाने लिहून घेऊन आंबेडकरी माणसाने प्रकाशित केले आहे. गांधी द्वेष जाणीवपूर्वक पसरवला जातो आहे. धर्म हा अस्मिता फुलविणारा असतो हे खरे, पण त्याशिवाय परंपरा म्हणून वेगळी गोष्ट असते.

**गांधीवर भर कशासाठी** आपल्या पूर्वसूरींमध्ये परंपरा जाणणारा माणूस तोच एक होता. दुसरे असे की गावाकडे परत जायचे असले तर, पर्याय म्हणूनही आपल्याला गांधींकडेच जावे लागते. गांधींचाच खून का झाला? आशिष नंदी म्हणतात, संघाला गांधी बरोबर कळले. Hatred makes your sight sharp. संघाची पहिली पन्नास वर्षे गांधीशी झगडण्यात गेली. त्यामुळे तेवढा काळ तो प्रभावी नव्हता. गांधींकडे सर्व पुरोगाम्यांनी पाठ फिरविल्यानंतरच संघाला त्यांच्या अजेंड्यासाठी बळ मिळाले.

**विजया चौहान:** संघाचे स्वरूप व कार्यपद्धती याबद्दल विस्तृत माहिती द्या.

**रवींद्र:** पूर्वीचा व आताचा रा स्व संघ ह्यात खूप फरक आहे. इ.स. १९२५ मध्ये त्याची स्थापना झाली. हेडगेवार हे संस्थापक व पहिले सरसंघचालक हे उत्तम संघटक होते. ते मूळचे काँग्रेसचे. नंतर गोळवलकर गुरुजी सरसंघचालक झाले. ते संघटक नसून तत्त्वज्ञ होते. सावरकर व गुरुजी ह्यांनीच हिंदुत्ववादाची वैचारिक मांडणी केली. संघाने सावरकरांचा अन्यधर्मीयांचा द्वेष घेतला पण समाज सुधारणेच्या बाबतीत चालूपणा करून बहुसंख्यांकांना न दुखावणारी भोंगळ मांडणी केली.

१९७५-७७ मध्ये जेलमध्ये गेल्यावर संघाचा पुनर्जन्म झाला. बाळासाहेब देवरस कारणीभूत. त्यांनी तुरुंगात जाणीवपूर्वक संघविरोधकांशी संवाद साधला. संघाविषयीचे आक्षेप समजून घेतले व त्यानुसार संघाने आपला मूळ गाभा कायम ठेवत स्वतःला बदलले. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रवेश केला. संघाच्या शाखेत लहानपणापासून जाऊन मनावरील संस्कार पक्के केले जातात. ही कार्यकर्त्यांची फौज नंतर शेती, इतिहासाचे पुनर्लेखन, ईशान्य भारतातील सेवा, आरोग्य, तत्त्वज्ञान सगळ्या क्षेत्रात काम करते. संघपरिवारात अनेक संस्था आहेत. त्यांचे आपसात सामंजस्य असते, पण त्या त्या वेळच्या रणनीतीनुसार संघ त्यांच्यापासून अंतर घेतो. उदा.- अतिशय जहाल हिंदुत्ववाद मांडणाऱ्या व्यक्ती, संस्था - साध्वी, सनातन संस्था आमच्या नाहीत.

**संघ बांधणीचा माझा अनुभव** अगदी लहानपणी संघात गेलो व कट्टर स्वयंसेवक बनलो. प्रथम स्वयंपाकघरात जाऊन बाईशी नाते जोडून मावशी, काकू म्हणून विचारपूस करायला संघाने शिकवले. आपण तसे करीत नाही. त्यासोबत संघ चिकाटीही शिकवतो. मी आठवी ते अकरावी वसतिगृहात राहत होतो. पण प्रत्येक सुटीत गावी गेल्यावर बंद पडलेली शाखा नव्याने सुरू करीत होतो. दलित वस्तीतही जाणीवपूर्वक जात होतो. एकटा उभा राहून झेंडा लावून प्रार्थना करून एक तासाने परत येत होतो. खेळही कसे तर मोगल – मराठे. हिंदूचा हिंदूस्तान असे म्हणायचे. मुसलमानांनी केलेले अत्याचार आणि आपल्या लोकांचे पराक्रम पुन्हा पुन्हा सांगितले जात. संघ आपल्या कार्यक्रमाला अन्य विचारांच्या किंवा कोणताही विशिष्ट विचार नसणाऱ्या लोकांना मुद्दाम बोलावतो. त्यानंतर त्यांच्याशी न कंटाळता संपर्क ठेवतो. शाखेत या, ते न जमल्यास कार्यक्रमात, तेही न जमल्यास फक्त गुरुदक्षिणा द्या. मध्यम वर्गाला संघकार्य म्हणजे समाजकार्य, राष्ट्रसेवा असे मनापासून वाटते. संघ शिक्षा वर्गात मोठमोठी प्रतिष्ठित मंडळी अन्न वाढायचे काम करतात. ते पाहून भारावलेले अनेक जण संघकार्याशी जोडले जातात. ईशान्य भारतातही त्यांनी सामाजिक कार्य केले आहे. संघटित ताकद. त्यामध्ये सहानुभूतिदारांची ताकद (गुडविल) जास्त.

गेल्या ऐंशी वर्षात भारतातील सर्व पुरोगामी संस्था, संघटना तुटल्या. समाजवाद्यांची, कम्युनिस्टांची अनेक शकले झाली. मात्र रास्वसंघ एकसंध राहिला. एवढेच नव्हे तर विस्तारला, फोफावला. ह्याचे श्रेय केवळ एकचालकानुवर्तित्वाला देणे आत्मघातकीपणाचे ठरेल. अहंकाराला मुरड घालायला आपण संघाकडून शिकलेच पाहिजे. गोळवलकर गुरुजींऐवजी देवरस सरसंघचालक होणार होते, पण ऐनवेळी गुरुजी झाले, त्यांनी देवरसांना अनुल्लेखाने मारले व लहान पद दिले, तरीही देवरस निष्ठेने गप्प राहून काम करीत राहिले. सांगलीच्या देवल ह्यांनी जातिनिर्मूलनाचे काम हाती घेतले व संघाने परवानगी न देताही ते तें एकनिष्ठेने करीत राहिले. कोणीही संघापासून तुटून बाहेर पडले नाही. हे निव्वळ आज्ञापालन नव्हे, त्यामध्ये निष्ठा आहे. हे पूर्वीच्या कम्युनिस्ट, सर्वोदयात होतेच. आज मात्र ह्यात बदल झाला आहे. आपण मानतो की क्रांतीचा रस्ता फार चिंचोळा आहे. मागून येणाराच माझा कॉम्रेड. पुढे जाऊ लागलास तर तू माझा शत्रू नंबर एक. ह्याला व्यक्तिगत अहंकार नाही तर आणखी काय म्हणायचे?

मोदी अधिक संघ हे समीकरण अधिक धोक्याचे का म्हणून? मोदींना अमेरिकेने व्हिसा नाकारणे हे जणू अमेरिकेच्या पुरोगामित्वाचे प्रतीक आहे असे आमचे मार्क्सवादी मित्रही मानत होते. अमेरिकेचे निधर्मीपणाशी, लोकशाहीशी काहीच देणे घेणे नाही हे आपल्याला माहीत नाही का? अमेरिकेला सारा देश लूटायला परवानगी दिली, तर ती मोदींना सन्माननीय नागरिकत्वही बहाल करील व आपल्याविरुद्धच्या लढाईत त्यांना मदतही करील. एकीकडे जागतिकीकरणाचा बेछूट सुटलेला घोडा व दुसरीकडे संघ अशा कैचीत आपण सापडलो आहोत. साई बाबांबरोबर पीर, सूफी संत ह्याच्यासारखी जी समन्वयाची प्रतीके आहेत, त्यांच्यावर प्रहार होईल. सामाजिकदृष्ट्या डावे असलेले जे लोक आर्थिकदृष्ट्या उजवे झाले, त्यांचीही त्यांना साथ आहे.

**डॉ. सुगन बरंठ**: गांधीवाद्यांच्या शिखर संस्थेतही असा अभ्यास कुणी केला नव्हता पण सर्व सेवा संघात गेल्यावर बजरंगच्या पिढीकडून मी शिकलो. आपण खरे तर आत्मविश्लेषण करायला पाहिजे. रमेश ओझा व यशवंत सुमंत ह्यांनीही अशा प्रकारची मांडणी केलेली आहे. मी व्यापक कामासाठी मालेगावच्या बाहेर पडलो, काही वर्षांनी परतल्यावर मला जाणवले की सार्वजनिक जीवनात मी निर्माण केलेली सर्व जागा संघाच्या मंडळींनी व्यापून टाकली आहे व आपल्या लोकांना त्याची जाणीवही नाही. आत्मपरीक्षण, अभ्यास ह्यांची आता कुणालाही सवय उरलेली नाही. पूर्वी १० दिवसांची शिबिरे आता ७ दिवसही जास्त होतात. छुटपुट कार्यक्रम घेत राहतात फक्त. आमच्या कामाचेच मूल्यमापन आम्ही करीत नाही. मालेगावला तेच, सेवाग्रामलाही तेच. नवीन लोकांना प्रशिक्षण देण्याचीही काहीच सोय नाही. मग मी पुस्तके शोधली. आपल्याकडे एक मुलगा आला, तर तो शेवटपर्यंत कसा राहील ह्याचा विचार आपण करीत नाही. पण मी निराश नाही. कारण आजही आपण ठरवून काम केले तर त्याला उत्तम प्रतिसाद मिळतो हा माझा अनुभव आहे. मालेगावला परतल्यावर मी स्वतःला प्रश्न केला, - तुम्हारे पोतेका क्या होगा? मग पुन्हा माझ्यापुरती राष्ट्रसेवादलाची शाखा सुरू केली. मी एक शिबिर आयोजित केले. त्यासाठी सिलॅबसही तयार केले. पंधरा दिवसांमध्ये नाटक, आकाशदर्शन, चित्रकला. शेवटच्या दिवशी आजी आजोबांसह पालकांची उपस्थिती होती. प्रचंड यश मिळाले. आपण शाखाप्रमुखाला शून्य समजतो. उलट त्याला २०,००० रु द्यायला पाहिजेत. अशा प्रकारची शिबिरे आजही सर्वत्र यशस्वी ठरतील.

**भारती शर्मा**: आत्मनिष्ठ परिक्षणाबरोबर आत्मनिरपेक्ष परीक्षण केले पाहिजे. खा उ जा धोरणाबरोबरच १९९१ साली झालेला सोवियत युनियनचा पाडाव हा संदर्भही लक्षात घ्यावा. जगात आज अनेक ठिकाणी उजव्या विचारसरणीची सरकारे आलेली आहेत. फ्रान्समध्ये बुरखा घालण्याचा प्रश्न चर्चेत आहे. अमोरिकेने पोसलेले तालिबानी, धार्मिक पुनरुज्जीवनवाद हे वास्तव आपला भाग नसले तरी आपल्यावर परिणाम करणारे आहे. त्याचा विचार व्हावा. जागतिक संदर्भात औद्योगिक भांडवलशाहीची जागा आता वित्तीय भांडवलशाहीने घेतली आहे. त्यामुळे घडणारे परिवर्तनही आपण ध्यानात घेतले पाहीजे. ७० ते ८० हा स्त्रीवादाचा सुवर्णकाळ होता हे खरे, पण तो काळ वेगळा. आजच्या काळाच्या संदर्भात विवेचन आवश्यक, पण ते आत्मक्लेशाकडे जाता कामा नये.

**कुंदा प्र नी**: केवळ भारतातच नाही, तर जगातच पुनरुज्जीवनवादी प्रवाह आला. चर्चेस, मशिदी, देवळे ह्यांची संख्या वाढली. सर्वत्र आपली वेगळी ओळख तयार करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत व त्याचा फायदा धर्मांध शक्ती घेत आहेत. हे निव्वळ दृश्य स्वरूप. ह्याच्या मागे एक अदृश्य संघर्ष फार कठीण आहे. मुस्लिम स्त्रिया आपापले प्रश्न सोडवण्यासाठी संघटनेत येत असल्या तरी धर्माशी घट्टपणे बांधलेल्या आहेत. आयडेंटिटी क्रायसिस गेल्या वीस वर्षांत का सुरू झाला, ह्याचा विचार केला पाहिजे. तो केवळ औद्योगिक व वित्तीय भांडवलशाहीशी संबंधित नसून धार्मिक एकाधिकाराशी जगभरात निगडित आहे. भारताचे सोशल फॅब्रिक व्यामिश्र आहे. जाती – पोटजातींत विभागलेले आहे.

**जयंत दिवाण**: आज लोकसभा, विधानसभा, कुटुंबसंस्था सर्वांमध्येच परिवर्तन झाले आहे. ते असे की व्यक्तिवादिता वाढत जाऊन सामूहिकतेचा, सामाजिकतेचा लोप झालेला आहे. म्हणून मला काही झाले तर मी सरकारलाच दोष देतो. हे पूर्वी असे नव्हते. कारण खा उ जा धोरणामुळे कुटुंबापासून संसदेपर्यंत सर्व संस्थांचा क्षय झालेला आहे, त्यामुळे राज्यसंस्था व व्यक्ती ह्यांच्या दरम्यान एक पोकळी निर्माण झाल्यामुळे लोक आपल्याला आधार शोधायला

निघालेत. हेच धार्मिक पुनरुज्जीवनवादाचे मूळ कारण. ह्याचा साकल्याने विचार व्हावा. केवळ संघाचा विचार करता येणार नाही.

**बजरंग:** आजच्या वातावरणात मी एकट्यादुकट्याला उत्तर देऊ शकतो, पण समूहाला नाही. सिद्धिविनायकाला जाणाऱ्याची गर्दी वाढली, त्याबद्दल टीका केली, तर लोक नास्तिक म्हणून लेबल लावून टाकतात व दुर्लक्ष करतात. म्हणून आजच्यासारखी चर्चा आवश्यक आहे. आम्ही – जात संपवा, जातीची होळी करा हा कार्यक्रम विदर्भात घेतला, कॉलेजमध्ये घेतला, तेव्हा तीव्र विरोध झाला. कार्यक्रम झाला नाही. अशा वेळी ह्या शक्ती बरोबर काम करतात. जल देश को तोडता है, मिट्टी देश को जोडती है हा कार्यक्रम झाला, पण त्याला म्हणावे तसे यश मिळाले नाही. मोदींच्या राज्यात आपली कोंडी होत आहे का?

**अनिल सावंत:** ७७ साली जॉर्ज फर्नांडिस जेलमध्ये असताना एक कामगार स्त्रीला सांगितले की तुझ्या बेड्या तुटतील, पण हा प्रश्न अजूनही सुटलेला नाही. आजचे भीषण वास्तव – जगभरात धर्मांधता बोकाळली आहे. कितीही जोरात सांगितले, तरी लोक मोठ्या प्रमाणावर बाबा-बुवांच्या मागे का लागत आहेत ते समजून घेतले पाहिजे. नोकरीतले आठ तास झाल्यानंतर चांगले काम करण्यास इच्छुक लोक सत्संगात जाऊन बसतात. दुबईत जाऊन पैसे कमवून पुण्यास परतलेला एक माणूस मला सांगतो की मला आणखी पैसे नकोत तर पुण्यात सनातन संस्थेचे काम करायचे आहे, कारण त्यातच मला जीवनाचे सार्थक वाटते.

विकासाचे कोणते मॉडेल आपल्याला स्वीकारायचे आहे हे आपण स्पष्ट केले पाहिजे. कारण रास्वसंघ, भाजप ह्यांना पक्के माहीत आहे की लोकांना विकासाचे गाजर दाखवल्याशिवाय लोक आपल्यासोबत येणार नाहीत. वेगवेगळ्या क्षेत्रात चांगल्या गोष्टी घडत आहेत हे खरे तर आपल्याला माहीत आहे पण ते सर्व एका सूत्रात बांधून लोकांपुढे सुसूत्रपणे ठेवले तरच लोक आपल्यासोबत येतील. आजच्या तरुणाला ह्यांनी आपल्यासोबत घेतले आहे. कारण विकास करणारे हेच लोक आहेत असे त्याला प्रामाणिकपणे वाटते. त्याला इतिहास माहीत नाही. जाणून घेण्याची इच्छाही नाही. त्याला फक्त व्यक्तिगत विकासाची आकांक्षा आहे. त्याचा भ्रमनिरास केव्हा होईल कोण जाणे. तंत्रज्ञानाने आज आमूलाग्र बदल घडवला आहे. आपण पूर्वी ह्याला विरोध केला होता, पण आज अनेक रूपांत ते आपल्यासमोर आहे. त्याविषयी निश्चित धोरण असावे. त्याशिवाय प्रसारमाध्यमांची भूमिका काय असावी ह्याचेही स्पष्ट उत्तर आपल्याकडे हवे.

संस्था, कुटुंबसंस्था, सपोर्ट रचना काय असावी ह्यांचे पर्याय काय असावेत ह्याचाही विचार आवश्यक.

**संजीव चांदोरकर:** रवीने महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. विचारसरणी व संघटन ह्याचा परस्परसंबंध असतो काय हा माझा नेहमी प्रश्न पडतो. कधीकधी विचारसरणी आर्टिक्युलेट नसतेही. पण संघटन चांगले असते. मी संघाचा वाढता प्रभाव, त्याचा जागतिक संदर्भ व त्याचे परिणाम नाकारत नाही. पण त्याच्या परस्परसंबंधाचा विचार होणे आवश्यक. जगभर भांडवलशाही ही ड्रायव्हिंग सीटवर आहे. औद्योगिक व वित्तीय ही एकाचीच प्रारूपे. जागतिक पटलावरती आज भारतातील बाजारपेठ हे अनेकांचे गंतव्यस्थान बनले आहे. जागतिक भांडवलाला आकर्षित करणारा आपला देश आहे ह्याचे भान ठेवावेच लागेल. धोरणात्मक अनिश्चितता हा भांडवलासाठी सर्वात मोठा धोका असतो नेहमीच. भांडवलाला भगवा, हिरवा वा लाल रंगही वर्ज्य नाही. राजकीय स्थिरता ही आवश्यक. त्यासाठी ते परताव्याचा कमी दरही मंजूर करते. म्हणून काँग्रेसचे गाडे गडगडले, तसतसे जागतिक भांडवलदार भाजपला बूस्ट करीत राहिले. इंग्लिशमधील ऑर्गॅनिक हा शब्द चांगला. जीव असणे, त्याची वाढ होणे, त्याने अन्न शोषून घेणे हे व्यवच्छेदक लक्षण. ते संघाकडे आहे. त्यामुळेच तो वर्धिष्णु आहे. ह्याउलट डाव्यांनी विचारसरणीच्या स्पष्टतेवर अतोनात भर दिला, विचारसरणी योग्य असल्यास ती उदबत्तीच्या वासाप्रमाणे पसरेल असा त्यांचा समज होता. त्यामुळे त्यांनी संघटना कौशल्याकडे दुर्लक्ष केले, ज्याने त्याची वाढ खुंटली.

**विजया चौहान:** मेक इन इंडियाचा नेमका अर्थ काय?

**संजीव**: प्रत्येक देशातील पक्षांची, भांडवलाच्या मर्यादा काय ह्याची उत्तम समज जागतिक भांडवलशाहीकडे आहे. ते कधीही आदर्शवादाची भूमिका घेत नाही. युरोपच्या सर्व संस्था कोसळणार असे अंदाज केले होते. अमेरिकेने भागभांडवल घालावे, भांडवलाची महत्ता टिकली पाहिजे, मालकी दुय्यम आहे असा निष्कर्ष काढला एवढी त्यांची प्रगल्भता आहे. हे आपण मान्य करून तशा प्रकारची प्रगल्भता आपणही दाखवली पाहिजे. डब्ल्यू टी ओ च्या पूर्ण विरोधात जाऊनही निर्मला सीतारामनने मांडलेली भारताची भूमिका त्यांनी मान्य केली आहे. ही आहे त्यांची परिपक्वता. हे सारे विरोधाभास खाऊन पचवणारे ते लोक आहेत. त्यासाठी त्यांच्याकडे प्रचंड चिकाटी आहे. भारतातले पायाभूत सुविधा, स्वस्त कामगार व शेवटी इथली बाजारपेठ हे त्यांना हवे आहे व ते ते मिळवूनच राहतील. एस ई झेड लाही हेच हवे आहे. उद्या ह्या सुविधा वेगळ्या देण्याचीही गरज राहणार नाही, साध्या कायद्यामधूनच ते घडेल व त्याची सुरुवातही झाली आहे. मोठमोठ्या भांडवलदारांनी भाजपाला स्पष्ट बहुमत मिळण्यासाठी मदत केली आहे. रास्वसंघ व आजचे नमो सरकार ह्यांचा नेमका संबंध काय हे मला माहीत नाही. संघ पाताळयंत्री नाही असेही मला म्हणायचे नाही. पण भांडवलशाहीची भूमिका लक्षात घेतली पाहिजे.

**रवीन्द्र**: त्या दोन्ही गोष्टी धोकादायक. दोहोंचा विचार करावाच लागेल.

**विजया**: सामाजिक अशांतता, असमंजसता त्यातून समाजातील एका भागाला जगणे अशक्य करणे हे काय आहे? सहकार चळवळही आज संकुचित झाली आहे. त्या सर्वांचा परिणाम काय होणार आहे?

**संजीव**: हेच मॉडेल कॉन्सोलिडेट करणे, आतले प्रश्न खदखदत ठेवणे, जास्त झाल्यास त्याला एक चापट ठेवून देणे हीच त्यांची नीती राहणार आहे. ऐंशी वर्षांनंतर मिळालेली संधी ते सोडणार नाहीत. तिसरा पर्याय – हिंदू मुस्लिम एकतेचे कार्यक्रम आता कोण करणार? तुष्टीकरणाचा संदेश पोचला. पर्याय कोणताच उरला नाही. विचारसरणीच्या स्पष्टतेवर शंभर तास खर्च केले तर संघटना बांधणीवर दहा तासही खर्च केले नाहीत.

**डॉ. विवेक कोरडे**: जर भांडवलशाहीच्याच हातात सर्व काही असले, तर राज्य काँग्रेसचे असो की संघाचे, फरक काय पडतो? ह्या देशात बहुसंख्य हिंदू आहेत व त्यांच्या विश्वासाचा, त्यांच्या उन्नतीचा मार्ग आमच्याकडे आहे हा विश्वास भाजपने साध्य केला, हे नाकारण्यात अर्थ नाही. म्हणून आपल्यापुढे, संघाचे खरे स्वरूप लोकांपुढे आणणे आणि संघ वा नमो ही गरीब, दलित, शोषित ह्यांच्याविरोधी शक्ती आहेत हे उघड करणे हे दोन मार्ग आहेत.

**अशोक राजवाडे**: नमोविरोधी व समावेशक संघटना उभी करणे आवश्यक. पर्याय तयार करावा लागेल. त्यामध्ये जागतिक भांडवल इत्यादीचाही विचार करावा लागेल. आम आदमी पार्टीने असा प्रयत्न केला, पण त्यांना वेळ कमी मिळाला.

**विवेक कोरडे**: लोकांमध्ये विश्वास निर्माण केल्यामुळे ते निवडून आले, तर आपण काय करीत होतो? वाजपेयी सत्तेवर आले तेव्हाही आपण काही केले नाही.

**विनय कामत**: आठ महिन्यांपूर्वी शक्यता निर्माण झाली होती, सदतीस वर्षांपूर्वी मोरारजींच्या वेळी देखील अशी शक्यता निर्माण झाली होती, पण जेपींसारखा फेविकॉल असूनसुद्धा ती माणसातल्या आधाशीपणाला, सत्ताकांक्षेला थोपवू शकली नाही. एक पर्याय जनतेला दिसल्याबरोबर जनता त्याच्या मागे जाते, पण तो स्थैर्य देऊ शकतो का? अण्णा हजारेही आपल्या मनोऱ्यात परत गेले. मोदींना दिलेले मत हे भाजपाला दिलेले मत नाही, एकाच व्यक्तीला दिलेले मत आहे.

**सुरेश सावंत**: रवीन्द्र ह्यांच्याशी पूर्णपणे सहमत. पुरोगाम्यांचे काय चुकले? ते कालबाह्य झालेत काय? असल्यास त्याचे कारण निव्वळ त्यांची निष्क्रियता हेच नव्हे. डाव्यांचा भर आर्थिक मुद्यांवर होता. जात, धर्मांधता, सांस्कृतिक मुद्दे ह्यांकडे त्यांनी दुर्लक्ष केले. जीवनाला समग्रपणे भिडणे आवश्यक असते, पण डाव्या शक्ती ट्रेड युनियनपुरत्या उरल्यामुळे त्यांच्या कार्यकर्त्यांचा त्याग वाया गेला.

आपणही काही भ्रामक कल्पना सोडून दिल्या पाहिजेत. उदा. दलित किंवा मुस्लिम हे जन्मजात पुरोगामी असतात. ह्याउलट ब्राह्मण कार्यकर्त्याला वेळोवेळी आपली छाती फाडून पुरोगामित्व सिद्ध करावे लागते.

चळवळीचे एनजीओकरण झाले तेव्हा चळवळ संपली. ढोंगीपणा वाढला, छोटीछोटी रिंगणे तयार झाली. आज एनजीओ बंद करणे हा पर्याय नाही. परंतु आज ऍक्टिव्हिस्ट व कम्युनिटी वर्कर्स वेगवेगळे आहेत हे ध्यानात ठेवले पाहिजे, चळवळ व एनजीओ ह्यांमधील सीमारेषा स्पष्ट ठरवल्या पाहिजेत कारण एनजीओच्या दबावातून फक्त डब्ल्यू एस एफ घडू शकते, पण त्यातून नवे राजकीय केंद्र उभे राहू शकत नाही.

**अनुराधा**: लहान गावांत राहत असताना मला असा अनुभव आला की निवडणुकीच्या प्रचाराच्या काळात रामाची पालखी मिरवत नेली जाते, व तिचे आपल्या घरासमोर स्वागत करण्यास प्रत्येकाला बाध्य केले जाते. परंतु मला ते करायचे नसल्यास, ते न करण्याचे, तसे ठामपणे सांगण्याचे बळ ह्या चर्चेतून मिळावे. तसेच निवडणूक व रामाची पालखी ह्यांचा परस्परसंबंध मध्यमवर्गीय महिलांना समजतच नाही, तो आपण त्यांना समजावून दिला पाहिजे. घराघरातील स्त्रीला, गृहिणीलाही ह्या कामात सामील करून घेऊन परिवर्तनाचे वाहक बनविले पाहिजे. आपल्या कार्यकर्त्या पतीच्या संबंधातही महिलांनी अधिक सक्रिय भूमिका घ्यावी. अपत्यांना त्याचे वेगळेपण समजावून सांगावे.

**सुनीति सु. र.** : रवीचे लेख हा या चर्चेचा आरंभबिंदू म्हणून मी पाहते. या विषयाला अनेक पदर आहेत. आपण कालविसंगत झालो असे मला वाटत नाही. एनएपीएम, अन्यही चळवळी, जगण्याच्या हक्काची आंदोलने, या सर्वांनी मिळून सामाजिक परिवर्तनाचा एक टप्पा गाठला आहे असे मला वाटते. तो त्या-त्या प्रश्नांची तड लावण्यासंदर्भात असेल, कायदे करण्याच्या किंवा बदलण्याच्या स्वरुपात असेल, शासनाला धोरणात्मक निर्णय घ्यायला भाग पाडण्याच्या संदर्भात असेल. संजीवने सांगितलेल्या परिस्थितीत (आक्रमक नवभांडवशाहीच्या) आपण हे जे काही साध्य करू शकलो ही देखील मोठी गोष्ट आहे. आपण विकासाचे प्रश्न उपस्थित करू शकलो, त्या आधारावर देशभर विकासाच्या मुद्यावर जगण्याच्या हक्काची आंदोलने झाली. आजची 'बचाव', 'हटाव' ही मुळात विकासाचा वेगळा पर्याय मागणारी आंदोलने आहेत. निसर्ग, मानवसमाज व सर्व जीवसृष्टी ह्या सर्वांच्या अस्तित्वासाठी आपण व्यवस्थेपुढे प्रश्न उपस्थित केले आहेत. तेंव्हा पुरोगामी चळवळ विखुरलेली असली तरी पुरोगामी विचार व पुरोगामी आंदोलने संपली आहेत असे मला वाटत नाही.

रवीने - हिंदुत्व: संघपरिवाराचे व गांधीजींचे' – हा महत्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. संघपरिवाराची हिंदुत्वाची संकल्पना भारतीय संस्कृतीला असहिष्णुता व एकारलेपणाकडे नेणारी आहे तर गांधीजींची हिंदुत्वाची (अथवा भारतीयत्वाची) संकल्पना येथील सहिष्णु परंपरा व बहुविधता यांच्या जोपासनेकडे नेणारी होती. भारतीय समाजाला समतेकडे नेण्याचा त्यांचा प्रयत्न होता. हे आपण आग्रहपूर्वक मांडणे आवश्यक आहे – विशेषत: मोदी आज ज्या पद्धतीने गांधीजींना 'प्रोजेक्ट' करत आहेत त्या पार्श्वभूमीवर. गांधींनी जे बदल समाजात घडवत नेले, तें ते स्वतःतही करीत गेले. हे प्रवाहित्व हेच आपले - पुरोगामित्वाचे संचित आहे व ते आपण व्यक्त केले पाहिजे.

समाजातील दलित-वंचितांचे लढे लढत असताना देखील हा प्रश्न पडतोच की त्या समुहांमध्ये तरी समतेचा विचार आपण कितपत रुजवू शकलो-शकतो? आपल्या प्रश्नापलीकडे ते समूह समूह म्हणून पुरोगामी प्रेरणा कितपत घेतात? आपल्या मुद्याशिवाय विषमतेच्या अन्य मुद्यांवर ते आपल्यासोबत येतात का? – परिवर्तनाच्या चळवळीपुढील हे पेच आहेत असं मला वाटतं.

मेधाताईंचा निवडणुकीतील पराभव हा निव्वळ संघटन किंवा 'मतदारसंघ' बांधले नाही म्हणून झालेला नाही. उलट त्या विभागात सर्वाधिक सघन असे जनाधारित काम होते. मात्र निवडणुकीच्या प्रक्रियेत पैशासह अनेक शक्ती कार्यरत असतात, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले. या सर्वाला आमआदमी पक्षाचे दिल्ली व इतरत्रचे काही चुकीचे निर्णयही कारणीभूत झाले आणि एक पर्याय बनताबनता विरून गेला, तेंव्हाच मतदारांनीही आपला असा एक निर्णय घेतला हे देखील आम्हाला त्यावेळी स्पष्ट जाणवले. तेंव्हा उद्या जरी अगदी आपणही निवडून आलो तरी भांडवलवादी शक्तींचाच प्रभाव आपल्यावर राहणार असेल तर मग संसदबाह्य राजकारणच प्रभावी करणे आवश्यक आहे का, याचाही विचार करायला हवा.

आपले लढे अनेकदा इश्यू बेस्ड बनतात. ते महत्वाचे आहेतच, परंतु त्याने समाजपरिवर्तनाच्या आपल्याच लढ्याला मर्यादा पडते. ढोबळमानाने विषमतेचे सर्व मुद्दे त्या अंतर्गत आपण उपस्थित करत असलो तरी विषमतेला मुळापासून उखडून टाकण्यासाठीचा लढा – असे त्याचे स्वरूप राहत नाही. शिवाय एकेका समाजसमूहाच्या विशिष्ट प्रश्नावर लढताना सर्व समाजाशी आपला संवाद, त्याला जायला हवे ते अपील कमी पडते का, हे देखील पाहिले पाहिजे. विशेषत: आज नवमध्यमवर्ग हा सर्व जाती-धर्मांमध्ये निर्माण झाला आहे तेंव्हा आपले जातिआधारित विषमता आणि शोषणाचे गृहीतक आणि वास्तव काहीसे बदललेले आहे. गरीबांच्या आकांक्षा ह्यादेखील मध्यमवर्गाच्या आहेत. “विकासाची फळे आता कोठे आम्हाला मिळू लागली, तेव्हा आता असा विकासच नको असे तुम्ही का म्हणता?” हा त्यांचा प्रश्न आहे. त्याला उत्तर काय द्यायचे, हा प्रश्न आहे. आपण संसाधनांवरील अधिकाराबद्दल बोलतो, पण संसाधनांवरचे अधिकार स्थानिकांना मिळाले तरी त्यातीलही वंचितांपर्यंत पोहोचतील का, हा देखील प्रश्न उरतोच. केवळ संसाधनांवरील अधिकारांबद्दल नव्हे तर समाजाअंतर्गतच्याही आर्थिक-सामाजिक विषमतांबद्दल बोलावे लागेल. ग्रामस्वराज्यासारख्या संकल्पनांचे काय करायचे, त्या कालसुसंगत करायच्या असतील तर गावसमाजाच्या पातळीवर किती काम करणे आवश्यक आहे, हे गंभीरपणे पहायला हवे.

आपले गरीब-श्रमिकांचे लढे लढवतानाही आपली भाषा अनेकदा टोकाची असते. ‘आपण व ते’ अशी वाटणी आपल्या अभिव्यक्तीतही अनेकदा असतेच. अशा वेळी अनेकदा आपला मित्र बनू शकणारा समुदाय आपणच ‘ते’ या कॅटॅगरीत टाकून देतो. मला वाटते की समतेच्या, परिवर्तनाच्या दिशेने जाणारी व सर्वांना सामावून घेऊ शकणारी एक भूमिका विकसित करणे, ती परिभाषित करणे, त्यावर आधारित (अनौपचारिक का असेना,) संघटन उभारणे आवश्यक आहे. अगदी नव्या तंत्रज्ञानाचा, विशेषत: माहिती तंत्रज्ञान, सोशल मीडिया इत्यादींचा सकारात्मकतेने वापर केला पाहिजे.

सर्वोदयी मंडळींनी देखील न्यूनगंड टाकून सर्वोदयाची भूमिका जोरकसपणे मांडली पाहिजे. ‘सर्वोदय’, ‘अंत्योदय’ यांइतके अर्थपूर्ण व आपल्या भूमिकेचा पूर्ण आशय मांडणारे शब्द मला तरी अद्याप सापडलेले नाहीत. अहिंसा, सत्य, सत्याग्रह हे शब्द आपल्याला गांधीजींनी दिले. बाबासाहेबांनी देखील सत्याग्रह हाच शब्द वापरला. गांधीजींनी पुरस्कारलेली मूल्ये संविधानात आली. मग हे सारे शब्द वापरायला कचरायचे कशाला? ते शब्द, त्या संकल्पना, तो विचार आजच्या परिप्रेक्षात मांडणे व कालसुसंगत पद्धतीने अनुसरणे म्हणजेच गांधींजीना समकालीन करून घेणे होय.

‘हम वैज्ञानिक स्वभाव के नही. मोदीने दिखाया है कि वे वह कर सकते है. मेरी समझ मे कोई पुरोगामी है ही नहीं.’ सिंगरूर प्रकरणानंतर हे स्पष्ट झाले की प्रत्येक पक्ष हा भांडवलवादी पक्षच आहे. जातीयवादाला शह देण्यासाठी वैज्ञानिकतेचा विकास करण्याची व जनतेत जाऊन प्रबोधन करण्याची गरज. संघटित धर्माची संकल्पना. पण धर्म कधी संघटित नसतोच. कोणताच माणूस कोणत्याही विचारधारेला मानणारा नसतोच. लोकशाही तंत्रज्ञान आणण्याची गरज. चर्चेतून उत्तरे कधीच मिळत नाहीत.

**बजरंग**: गांधीचा खून का झाला? आत्मकथा वाचताना हिंदू म्हणून किती संस्कार होते, तरी त्यांचा खून होतो, आणि आंबेडकर म्हणतात मी हिंदू म्हणून जन्मलो तरी तसा मरणार नाही, तरी त्यांचा खून होत नाही. दुसरीकडे गोडसे समर्थक अतिशय हीन पातळीवर उतरून गांधींच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवतात.

**प्रियदर्शन भारती**: मी एक नवीन, तरुण कार्यकर्ता आहे. मला काही प्रश्नांची उत्तरे तुमच्याकडून हवी आहेत.-

- आपला मुख्य शत्रू कोण – धर्मांधता की भांडवलशाही?
- धर्मनिरपेक्षता म्हणजे काय? त्यात ओवेसी कोठे बसतो? त्याच्या बद्दल कोणी बोलत का नाही?
- रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीसारखी आपली संस्था आपण तयार करू शकतो का?
- पुरोगामी संघटनांची दयनीय अवस्था आहे, त्यावर उपाय काय?
- आजचे नेते गेल्यावर आंदोलनाचे भविष्य काय?

- कार्यकर्त्यांना आपण काही प्रतिष्ठा (ग्लॅमर) देणार आहोत काय?
- पुरोगामी युवक व विद्यार्थी संघटना मजबूत कशा बनतील?
- लालू, मुलायम हे पर्याय होऊ शकत नाहीत, तर आजच्या राजकारणाला आपण पर्याय कसा उभा करणार?

सावरकर, भगतसिंग ह्यांची पुस्तके वाचून आपण इतर चळवळींचा अभ्यास करावा असे वाटले. अनेक आंदोलनांमध्ये सहभागी झालो. मग संघाचा खोटेपणा उघड झाला. विश्वास आला की घरचे नसले तरी चळवळीचे लोक आपल्यासोबत आहेत. गांधी वा आंबेडकर ह्यांच्याशी आजच्या युवकाला काही घेणे नाही. त्याला बदल हवा आहे. त्यासाठी तो कुणाचाही झेंडा उचलायला तयार होईल.

**अशोक राजवाडे**: आपण आपापल्या विचारधारा बाजूला ठेवून ह्या तरुणांचे म्हणणे काळजीपूर्वक ऐकले पाहिजे.

**कुंदा प्र. नी.** : आपण आता पर्यंत घालवलेली वर्षे फुकट गेली कारण परिवर्तन म्हणजे converting the converts, असेच घडले.

त्यानंतर पुस्तिका प्रकाशित करण्याबद्दल चर्चा झाली. त्यात आलेल्या सूचना पुढीलप्रमाणे.

- सर्वोदय साधनेच्या हीरक महोत्सवानिमित्त सर्वोदयाकडे ही चर्चा व्हावी. त्याशिवाय आणखी दोन चार ठिकाणी ती चर्चा व्हावी. त्यानंतर पुस्तिकेला अंतिम स्वरूप द्यावे.
- पुरोगामी चळवळीवरील टीका व संघावरील टीका वेगळ्या कराव्या.
- सध्या सुरू असलेल्या चर्चेला अंतिम रुप देऊन पुस्तिका तयार करावी. ती पुरोगामी कार्यकर्त्यांसाठी असेल. रवीने त्यासोबतच सर्वसामान्य जनतेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नेमका कसा आहे हे समजावून सांगणारी वेगळी पुस्तिका लिहावी.

प्रा. यशवंत सुमंत व प्रा. सदानंद मोरे ह्यांच्याशी ह्या विषयावर चर्चा केल्यास ती उपयोगी ठरेल.

ह्यानंतर आपापल्या संघटनांतर्फे कोणते कार्यक्रम घेता येतील ह्याविषयीच्या सूचना आल्या. त्या अशा

- राष्ट्रसेवा दलाच्या शाखांना ताबडतोबीने पुनरुज्जीवन करावे.
- राष्ट्रसेवा दलाच्या आदेशांची वाट न पाहता जमेल त्या पद्धतीने लहान मुलांमध्ये काम सुरु करावे. चळवळीच्या माध्यमातून लहान मुलांसाठी आताच नाटके करणे. खेळ, गाणी, निबंधस्पर्धा वगैरे काम करता येईल.
- २६ जानेवारीला संविधानाची उद्देशिका लोकांना समजावून सांगावी.
- २६ जानेवारीच्या निमित्ताने विविध माध्यमे, उदा. नाटक, फिल्म शो, टॉक शो, वापरून लोकशाही उत्सव साजरा करावा. त्याला जोडून पर्यायी विकास पद्धती 'साजऱ्या' करणारा जीवनोत्सव भरवावा.
- संघाची सत्ता आल्यापासून सांस्कृतिक दहशतवादाची भीती सर्वांना भेडसावते आहे. त्या मुद्याला धरून काम व्हावे.
- आज तरुण पिढी 'प्रेम व्यक्त करण्याचा अधिकार' असे वेगळे (डाव्यांना माहित नसलेले) मुद्दे घेवून संघाच्या दहशतीविरुद्ध उभी राहते आहे. आपण तिची साथसंगत करणार का?
- ह्या पुस्तिकेतील अनेक मुद्दे छोट्या परिच्छेदात बसवून फेसबुक सारख्या माध्यमातून प्रसृत करावे. आपण सर्वांनी ह्या माध्यमांची ताकद ओळखून त्या पद्धतीने लिहिण्याचा प्रयत्न करावा.
- विभिन्न विषयांवर फिल्म शो व त्यावर चर्चा ह्या माध्यमाचा वापर करावा.

अखेरीस आपला सर्वांचा ह्यानंतरही सैल, पण संवादी समन्वय असावा, ह्या सुरेश सावंत ह्यांनी व्यक्त केलेल्या अपेक्षेने चर्चेचा समारोप झाला.

anumohoni@gmail.com,

■■■

# मला दंड द्या!

*रमाकांत पाठक*

देशावर, समाजावर अशी घोर आपत्ती व पतन पाहून
या कठिण संकटकाळातून सुटकेसाठी –
पुनः पुन्हा व आवश्यक चिंतन–मननानंतर-
मला एखादा विचार मार्ग पटला आहे.
पण
अशा विचारमार्गावर आचरणासाठी
माझे हातपाय गळत असतील
आणि
अशा विचारांनुसार जीवन जगण्यासाठी
मी प्रगतीशील व प्रयत्नशील नसेल;
तर
हे माझ्या देशा, माझ्या समाजा –
मला दंड द्या.
माझ्या नाकर्तेपणाचा धिक्कार करा भर चौकात.
हे मला जगवणाऱ्या माती;
माझ्या फुफ्फुसात भरलेली हवा;
माझे सिंचन करणारे जल;
ह्या कठिण काळातही
जगण्याच्या माझ्या तटस्थतेवर थुंका.
हे माझ्या मुक्त आकाशा, माझ्या विनम्र झाडांनो,
आणि धडधडून पेटलेल्या अग्नीशिखांनो;
माझ्या सोई-सुविधालोलूप दिशाहीनतेसाठी
मला दंड द्या.
फाशीहून कमी तर नक्कीच नाही.
माझ्या बनेल मौनासाठी मला दंड द्या.
माझ्या जिभेवर झालेल्या फोडांसाठी –
माझ्या प्रेतालाही दंड द्या.
आपल्या आठवणीत
मानवी जीवन व्यर्थ घालवणाऱ्या
माझ्या अळीसारख्या आणि पशुतुल्य जगण्याला
रात्रंदिवस चाबकाने फटके मारा.
आयुष्यभर.

(प्रेरणाः बाबुशा कोहली ह्यांची हिंदीतून अनुवादित केलेली व आजचा सुधारक नोव्हेंबर 2014 च्या अंकात प्रसिद्ध झालेली *दंड* ही कविता)

■■■

---

नमस्कार,
‘आजचा सुधारक’ च्या संकेत स्थळावर आपले मनःपूर्वक स्वागत.
गूगल सर्च वर www.aajachasudharak.in कॉपी पेस्ट केल्यास संस्थळ उपलब्ध होईल.
हे संस्थळ लेखक व वाचकांच्यासाठी पुरोगामी विवेकवादी विचारांना उत्तेजन देणाऱ्या व्यासपीठाच्या स्वरूपात असेल. या विचारांचे लेख, चर्चा, प्रतिसाद यांचा समावेश यात असून त्यांचे येथे स्वागत होईल.
**मुख्यपाना**बरोबर **मनोगत, लेखकसूची**, **विषयसूची**, **विशेषांक, ग्रंथसूची, मागील अंक** इत्यादी सदर या संस्थळावर आहेत**.**
छापिल मासिकाप्रमाणे दर महिन्याचे लेख **नवीन लेख** या सदराखाली येत राहतील. लेखावरील प्रतिसादांचे स्वागत होईल. कृपया संपर्कात उल्लेख केलेल्या ई- पत्त्यावर आपल्या सूचना, प्रतिसाद पाठवावे व संस्थळाच्या उद्दिष्टाशी पूरक असे लेख पाठवावीत, ही विनंती.

---